सत्यमेव जयते

# अनुसूचित जाती कल्याण समिती

## २०१५-२०१६

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**नवी मुंबई महानगरपालिका, सिडको व पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई यांच्या सेवेतील अनुसूचित जाती प्रवर्गाचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा....**

# सातवा अहवाल

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक ३० मार्च, २०१७ रोजी सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
विधान भवन, मुंबई
मार्च, २०१७

# अनुसूचित जाती कल्याण समिती

## २०१५-२०१६

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

**नवी मुंबई महानगरपालिका,सिडको व पोलीस आयुक्त कार्यालय,
नवी मुंबई यांच्या सेवेतील अनुसूचित जाती प्रवर्गाचे अधिकारी/कर्मचारी यांची
भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांचेसाठी राबविण्यात येणाऱ्या
विविध कल्याणकारी योजनांसंबंधीचा.....**

# सातवा अहवाल

एचबी १६७९-१

**अनुसूचित जाती कल्याण समिती**

**(२०१५-२०१६)**

**समिती प्रमुख**

(१) डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. लखन मलिक, वि.स.स.

(३) श्री. हरिष पिंपळे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(५) श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

(६) श्री. रमेश बुंदीले, वि.स.स.

(७) श्री. सुभाष साबणे, वि.स.स.

(८) डॉ. सुजित मिणचेकर, वि.स.स.

(९) प्रा. वर्षा गायकवाड, वि.स.स.

(१०) श्री. नरहरी झिरवाळ, वि.स.स.

(११) श्री. इम्तीयाज जलील सय्यद, वि.स.स.

(१२) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१३) ॲड. जयदेव गायकवाड, वि.प.स.

(१४) श्री. प्रकाश गजभिये, वि.प.स.

(१५) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. सुनिल मयेकर, कक्ष अधिकारी.

---

सन २०१५-२०१६ या वर्षाकरिता मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा व मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी अनुक्रमे दिनांक १ मे २०१५ व दिनांक २१ मे २०१५ रोजी अनुसूचित जाती कल्याण समिती नामनिर्देशित केली आहे.

एचबी १६७९-१अ

**अनुक्रमणिका**



| अनुक्रमांक<br>(१) | विषय<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>(३) |
|---|---|---|
| | प्रस्तावना | (सात) |
| १ | अहवाल नवी मुंबई महानगरपालिका, सिडको व पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई. | १ |
| २ | परिशिष्ट " एक "<br>(नवी मुंबई महानगरपालिका व सिडको यांच्याकडून समितीला प्राप्त झालेली माहिती) | २७ |
| ३ | परिशिष्ट " दोन "<br>(समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त) | ९९ |

## प्रस्तावना

मी, अनुसूचित जाती कल्याण समितीचा समिती प्रमुख, समितीने अधिकार दिल्यावरून समितीचा सातवा अहवाल सभागृहाला सादर करीत आहे.

समितीने नवी मुंबई महानगरपालिका, सिडको व पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई येथे प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या सेवेतील अनुसूचित जातीचे अधिकारी/कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना व विशेष घटक योजनांसंदर्भात माहिती जाणून घेण्याचे ठरविले व त्यानुसार उपरोक्त विभागाच्या संदर्भात तयार केलेल्या प्रश्नावलीबाबतची माहिती सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत मागविण्यात आली.

समितीने उपरोक्त प्रश्नावलीच्या संदर्भात प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे दिनांक २७ व २८ एप्रिल, २०१६ रोजी नवी मुंबई महानगरपालिका, सिडको व पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई येथे प्रत्यक्ष भेट देऊन तेथील संबधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

समितीस पुरविण्यात आलेली लेखी माहिती व प्रत्यक्ष भेटीच्यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी समितीसमोर दिलेल्या साक्षीच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने समितीने दिनांक ९ नोव्हेंबर २०१६ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. प्रत्यक्ष भेटीच्या वेळी व विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीचा सर्वंकष विचार करून समितीने आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केलेल्या आहेत. परिशिष्ट एक मध्ये नवी मुंबई महानगरपालिका व सिडको यांच्याकडून समितीला प्राप्त झालेली माहिती तसेच परिशिष्ट दोन मध्ये समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त दिलेले आहे. समितीने दिनांक १८ मार्च २०१७ रोजी प्रारूप अहवालावर विचार करून तो संमत केला.

नवी मुंबई महानगरपालिका, सिडको व पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई यांच्या आस्थापनेवरील साक्षीच्या वेळी, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव (२), नगरविकास विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग, उप सचिव, सामाजिक न्याय विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, नवी मुंबई महानगरपालिका, सह व्यवस्थापकीय संचालक, सिडको व आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई तसेच इतर संबंधित अधिकारी यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन जे सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ३० मार्च, २०१७

**डॉ सुरेश खाडे,**
समिती प्रमुख,
अनुसूचित जाती कल्याण समिती.

## अहवाल

### नवी मुंबई, महानगरपालिका

अनुसूचित जाती कल्याण समितीने दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन त्यांच्या आस्थापनेवरील अधिकारी / पदाधिकाऱ्यांसमवेत अनौपचारिक बैठक आयोजित करण्यात आली. महानगरपालिकेतील अनुसूचित जातीच्या अधिकारी व कर्मचारी यांची भरती, बढती, आरक्षण व अनुशेष तसेच त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबत सविस्तर चर्चा केली.

समितीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकरिता वैद्यकीय व तत्सम संवर्गातील पदे निर्माण करण्याकरिता मान्यता कधी मिळालेली आहे व शासनाकडे आकृतिबंध कधी पाठवलेला आहे? अशी विचारणा केली असता महानगरपालिकेच्या आयुक्तांनी असे नमूद केले की, तत्त्वतः मंजुरी सहा महिन्यांपूर्वी मिळालेली आहे. शासनाने नुकताच आरोग्य विभाग, नवी मुंबई महानगरपालिकेचा आकृतिबंध मंजूर केलेला आहे. बाकीच्या विभागांचा आकृतिबंध पाईप लाईनमध्ये आहे. शासनाकडे सन २००५-२००६ मध्ये आकृतिबंधाचा प्रस्ताव पाठविलेला आहे. त्यात शासनाने त्रुटी काढलेल्या असून त्रुटींची पूर्तता देखील वेळोवेळी करण्यात आलेली आहे. तत्कालीन नगरविकास सचिव श्री. मनुकुमार श्रीवास्तव यांच्याकडे आकृतिबंधासंबंधी किमान १२ ते १५ वेळा बैठका झाल्या आहेत. तसेच तत्कालीन नगरविकास सचिव श्री. श्रीकांत सिंह यांनी सन २००८ मधील आकृतिबंधामध्ये सुधारणा करायला सांगितले होते. आता विद्यमान नगरविकास सचिव श्रीमती मनिषा म्हैसकर यांच्याकडे ४ ते ५ वेळा बैठका झालेल्या आहेत. आम्ही जो आकृतिबंध सादर केला होता त्यात त्रुटी काढून पूर्तता करण्यास सांगितले आहे. श्रीमती मनिषा म्हैसकर, सचिव, नगरविकास विभाग यांच्याकडे बैठक झाल्यामुळे आरोग्य विभागासाठी १०८५ पदांचा आकृतिबंध मंजूर करण्यात आला आहे. आरोग्य विभाग सोडून अन्य विभागांसाठी आकृतिबंध अजून मंजूर झालेला नाही. समितीने अनुसूचित जातीच्या उमेदवारांना शासकीय सेवेमध्ये घेण्यासाठी कोणीही रोखू शकत नाही. त्यामुळे महानगरपालिकेने शासनाला पत्र लिहावे की, अनुसूचित जातीचे उमेदवार नवी मुंबई महानगरपालिकेच्या सेवेत घेतल्यामुळे शासनावर कोणत्याही प्रकारचा भार पडत नाही म्हणून त्या पदांस मान्यता द्यावी.

समितीने नवी मुंबई महापालिकेने सेवाप्रवेश नियम तयार केले आहेत काय सेवाप्रवेश नियमास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे काय व दिनांक ११ एप्रिल २०१४ नंतर सेवाप्रवेश नियमाची स्थिती काय आहे व त्यास शासन मान्यताप्राप्त न होण्याबाबतची कारणे काय आहेत अशी विचारणा

केली असता, आयुक्त यांनी अशी माहिती दिली की, दिनांक २ जुलै २००८ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने महापालिकेचे अधिकारी/कर्मचारी यांचे मॉडेल सेवाप्रवेश नियम तयार करण्याबाबत सर्व महापालिकांना सूचित केले होते. त्यानुसार नवी मुंबई महापालिकेने नवी मुंबई महापालिका सेवाभरती व सेवेचे परिरक्षण नियम, २००८ तयार केले. सदर सेवाप्रवेश नियमाचा प्रस्ताव दिनांक १९ डिसेंबर २००९ रोजी जनरल बॉडीपुढे सादर करण्यात आला होता. तथापि, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची " ड ", प्रकरण २(क) मधील तरतुदीनुसार प्रस्तावित सेवाप्रवेश नियम शासनाकडे दिनांक ११ एप्रिल, २०१४ रोजी पाठविण्यात आले आहेत. रुल्स रिव्हाईज करण्यासंदर्भात शासन स्तरावर अनेक बैठका झाल्या. त्या बैठकांमध्ये त्यांनी सेवाप्रवेश नियम अनेकदा रिव्हाईज करण्यास सांगितले. त्यांनी ज्या त्रुटी काढल्या आहेत त्या दूर केल्या असून सध्या परिपूर्ण प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे. सर्वप्रथम २००६-०७ मध्ये प्रस्ताव सादर केला होता. त्यावेळी तत्कालीन सचिवांबरोबर १० ते १२ बैठका झाल्या. त्यांनी प्रस्ताव रिव्हाईज करण्यास सांगितले, त्यानुसार २००८ ला सुधारित प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. समितीने रिव्हाईज प्रस्ताव केव्हा पाठविला आहे, तसेच त्रुटींची पूर्तता करूनही प्रस्ताव मंजूर करण्यास शासनाकडून विलंब होत असेल तर समिती याबाबत मदत करू शकते व काही अडचण आली तर ती समितीच्या निदर्शनास आणावी असे समितीने सांगितले.

समितीने नवी मुंबई महापालिकेत २०१२ ते २०१५ अखेरपर्यंत वर्ग अ,ब,क व ड मध्ये तांत्रिक व अतांत्रिक संवर्गात सरळसेवेने व पदोन्नतीने भरलेल्या पदांमध्ये अनुसूचित जातीच्या आरक्षणांतर्गत किती पदांचा अनुशेष भरावयाचा होता, सदर अनुशेष भरण्यात आला आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा केली असता आयुक्तांनी विदित केली की, शासनाकडे आकृतिबंध प्रस्तावित केला आहे त्याला अनुलक्षून हा अनुशेष आहे. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेमध्ये आकृतिबंधाला मंजुरी घेतली आहे. त्या अनुषंगाने हे कॅलक्युलेशन केलेले आहे. हा पूर्वी पासूनचा अनुशेष आहे. १६८८ पदांना मंजुरी मिळाली होती. आवश्यक पदे भरलेली आहेत. सन २०१४ मध्ये वर्तमानपत्रात जाहिरात दिली होती. शासनाकडून सन २००४-२००५ मध्ये १२५ पदांना मंजुरी मिळाली होती. सन २००८ मध्ये १६८८ पदांना मंजुरी मिळाली आहे. आम्ही दर तीन वर्षांनी मागासवर्ग कक्षाकडून बिंदूनामावली तपासून घेतली आहे. मुकादम, वाहन चालक या पदांना सन २००६ मध्ये मंजुरी मिळाली होती. दोन पदे सोडली तर नवीन पदे निर्माण केलेली आहेत.

समितीने अनुसूचित जातीच्या अधिकारी व कर्मचा-यांकडून काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत काय अशी विचारणा केली व असा अभिप्राय दिला की, या प्रवर्गातील अधिकारी व कर्मचा-यांची प्रकरणे आयुक्तांपर्यंत जातच नाही. आपण सकारात्मक भूमिका घेऊन प्रकरण आयुक्तांकडे सादर केले पाहिजे. आपण आम्हाला जे पुरवणीपत्र दिले आहे त्यात एकाही तक्रारीचा अर्ज आलेला नाही अशी माहिती दिलेली आहे. समितीकडे तर तक्रारीचा पाऊस पडला आहे. अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यांना न्याय देण्यासाठी समिती येथे आलेली आहे. यंदा आपण महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १२५ वी जयंती साजरी करीत आहोत. त्यामुळे आपण अनुसूचित जातीच्या कर्मचाऱ्यांना न्याय दिला पाहिजे, आरक्षणाची अंमलबजावणी झालीच पाहिजे.

समितीने वर्ग-अ (तांत्रिक) पदांमधील ५ पदांच्याबाबत विचारणा केली असता उपायुक्त यांनी याबाबत विशद केले की, महापालिकेने एकूण मंजूर केलेली १७७४ पदे आहेत. नव्याने ५५३१ पदांना आम सभेने मंजुरी दिलेली आहे. वर्ग-अ, तांत्रिक मध्ये ५ पदांचा अनुशेष आहे. स्त्री रोग तज्ज्ञ या सारखी जी पदे आहेत त्या पदाना वॉक-इन इंटरव्ह्यू घेऊन देखील उमेदवार मिळत नाही. स्त्री रोग तज्ज्ञासाठी मागणी जास्त आहे. या पदासाठी जाहिरात देखील दिलेली आहे. उप अभियंता सरळसेवेतील १ पद आहे ते जिल्हा परिषदेतून प्रतिनियुक्तीवर भरण्यात येत आहे. शिक्षणाधिकारी या संवर्गातून अनुसूचित जातीतून एक पद भरावयाचे आहे. शिक्षण मंडळ बरखास्त झाल्यामुळे जिल्हा परिषदेतून प्रतिनियुक्तीने हे पद भरण्यात येते.

समितीने अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेल्या वर्ग अ ते ड मधील (सरळसेवा व पदोन्नती) पदांपैकी सन २०१२ ते २०१५ च्या अखेरीस अनुक्रमे २५, २२ व १९ पदांचा अनुशेष होता हे खरे आहे काय, असल्यास, सदर पदांची सद्यःस्थिती काय आहे, सदर पदे अद्याप रिक्त आहेत काय, सदर अनुशेषाची पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत? असा मुद्या उपस्थित केला असता आयुक्त यांनी असे सांगितले की, नवी मुंबई महानगरपालिकेतील सरळ सेवेची भरती करताना वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिद्ध करण्यात येते. सेवायोजन कार्यालय, ठाणे व समाजकल्याण, ठाणे यांच्याकडून उमेदवार मागवून घेण्यात येतात किंवा एजन्सी मार्फत भरती प्रक्रिया केली जाते. वर्ग ब, क, ड साठी मौखिक परीक्षा घेण्यात येते.

समितीने आपल्याकडे शाळा आहेत. त्यात वर्ग अ ची अनुशेषाची किती पदे रिक्त आहेत? मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक या पदांमध्ये अनुसूचित जातीचा किती अनुशेष आहे? अशी विचारणा केली असता अतिरिक्त आयुक्त यांनी अशी माहिती दिली की, नवी मुंबईतील प्राथमिक

शाळांची संख्या ६८ आहे. शिक्षक व मुख्याध्यापक यांची एकूण पदे ७१५ आहे. यात ५८ मुख्याध्यापक व ६५७ शिक्षकांची पदे आहेत. नवी मुंबईत मराठी माध्यमाच्या शाळेत ७, हिंदी माध्यमाच्या शाळेत ३ व उर्दू माध्यमाच्या शाळेत २ पदे जास्त भरली आहेत. सन २००० मध्ये शिक्षण मंडळाचे हस्तांतरण झाले आहे. जिल्हा परिषदेतील स्थानिक शिक्षक आमच्याकडे वर्ग झाले. त्या नुसार रोस्टर तयार झाले आहे. असे असले तरी आमच्या येथे शिक्षकांची पदे रिक्त आहेत. ती भरण्यासाठी आम्ही शासनाला कळविले आहे. आता आम्ही सीईटीसाठी थांबलो आहोत. आमच्याकडे सन २००९ पासून सीईटी बंद आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, जेव्हा निर्णय होईल तेव्हा आपण व्यवस्थिपणे भरती करावी. सदर भरती करताना मागील अनुशेष देखील भरून काढावा. मग पुढचा अनुशेष भरून काढावा. तसेच समिती आमच्याकडे जी निवेदने आली आहेत त्याची प्रत आपल्याला देतो. त्यासंबंधी आपला अहवाल समितीला सादर करावा असे सुचविले. आयुक्त यांनी नवी मुंबई महानगरपालिकेचा आकृतिबंध ३५०० पदांचा आहे. त्यापैकी एकूण १७७४ पदे शासनाने मंजूर केली आहेत, अशी माहिती दिली.

समितीने सफाई कामगार कॉन्ट्रॅक्टवर घेतले जातात, त्याचे टेंडर काढण्यात येते काय अशी विचारणा केली असता आयुक्तांनी असे सांगितले की, बरेचसे कॉन्ट्रॅक्ट परफॉर्मन्स बेसवर दिले आहेत. त्यांना पॅरामीटर देतो. त्या बेसवर पेमेंट केले जाते. सन १९९२ मध्ये ही महापालिका स्थापन झाली त्यावेळेस जिल्हा परिषदेचे कर्मचारी, एमजेपीचे कर्मचारी महापालिकेकडे डायरेक्ट वर्ग करण्यात आले. ग्रामपंचायतीतून १२५ सफाई कामगार वर्ग झालेले होते. त्यापैकी ४५ ते ४८ कामगार मृत पावले. लाड पागे समितीच्या शिफारशींचे पालन करून शैक्षणिक अर्हता असेल त्याप्रमाणे त्यांच्या वारसांना सेवेत सामावून घेतले आहे. तीन प्रकरणे कोर्टात प्रलंबित आहेत.

समितीने अनुसूचित जातीतील अधिकारी व कर्मचारी यांना सेवेत पदोन्नती देण्यासंदर्भात निवड समिती कधी स्थापन करण्यात आली आहे? या निवड समितीमध्ये अनुसूचित जातीतील अधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे काय? नसल्यास त्याची कारणे काय आहे अशी विचारणा केली असता आयुक्तांनी माहिती दिली की, समिती स्थापन झालेली आहे. पृष्ठ क्रमांक १६८ वर त्याबाबतची माहिती दिली आहे. होय. दिनांक १९ डिसेंबर २०१५ रोजी या कक्षाची पुनर्रचना केली आहे. श्री. चंद्रकांत तायडे, सहाय्यक आयुक्त, श्री. निळकंठ कोळी, वसुली अधिकारी, श्री. विकास संख्ये, वरिष्ठ लिपिक, श्री. अशोक कोळी, वरिष्ठ लिपिक, श्रीमती मंगला डोके, माहिती नोंदणीकार अशा पाच अधिकाऱ्यांचा समावेश असलेला कक्ष स्थापन केला आहे.

समितीने अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी बिंदू नामावली नोंदवही ठेवण्यात आली आहे काय? असल्यास केव्हापासून तसेच ती अद्ययावत स्वरूपात आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा केली असता सहायक आयुक्त यांनी सन २०१२ पर्यंत तपासणी झालेली आहे असे सांगितले. समितीने अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरताना मुलाखतीच्या वेळी उपस्थित राहण्याबाबत जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना आगाऊ कळविण्यात आले होते काय? कळविले नसल्यास त्याची काय कारणे आहेत? कळविले असल्यास सन २०१२ ते सन २०१५ या कालावधीत वर्षनिहाय कोणकोणत्या तारखांना मुलाखतीच्या वेळी जिल्हा समाजकल्याण अधिकारी उपस्थित होते अशी विचारणा केली असता उपायुक्त यांनी विदित केले की, दिनांक १३ ऑगस्ट २०१२, १९ जुलै २०१४, १५ जुलै २०१५ रोजी पत्र पाठविण्यात आले आहे.

समितीने अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांबाबत व पदे भरल्याबाबत अहवाल संचालक, समाजकल्याण तसेच सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय (मागासवर्ग कक्ष) व सचिव, नगरविकास विभाग यांना पाठविण्यात आला आहे काय? असल्यास सन २०१२ ते ऑक्टोबर, २०१५ पर्यंत केव्हा केव्हा पाठविण्यात आला आहे? असे विचारले असता उपायुक्त यांनी असे सांगितले की, अहवाल नियमितपणे पाठविण्यात आलेला आहे.

समितीने विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष) यांनी अनुसूचित जातीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या आरक्षणाबाबत सन २०१२-२०१३ ते ऑक्टोबर, २०१५ या कालावधीत महानगरपालिकेची तपासणी केली आहे काय? असल्यास, कोणत्या तारखांना केली आहे? असे विचारले असता विभागीय आयुक्तांनी सन २०१२ मध्ये तपासणी झाली आहे असे सांगितले. समितीने महानगरपालिकेचे सन २०१२-१३, २०१३-१४, २०१४-१५ या कालावधीत वर्षनिहाय अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे? अशी विचारणा केली असता आयुक्त यांनी सन २०१२-१३ ला २२०१ कोटी, २०१३-१४ ला २६८० कोटी, २०१४-१५ ला २०९९ कोटी रुपये अंदाजपत्रक होते असे सांगितले. समितीने अंदाजपत्रक कमी होत जाण्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा केली असता आयुक्तांनी असे सांगीतले की, बजेट वास्तव्यावर रहात नाही. स्थायी समिती, महासभेमध्ये बजेट वाढविले जाते. समितीने अनुसूचित जातीच्या लोकांसाठी बजेटच्या ५ टक्के निधी राखून ठेवला जातो. समितीने अहवाल वर्षात किती रक्कम राखीव ठेवली होती व ती कुठे खर्च करण्यात आली? असे विचारले असता. आयुक्तांनी असे सांगीतले की, अनुसूचित

जातीसाठी ५ टक्के निधी राखीव ठेवावयाचा आहे. शासन परिपत्रकाप्रमाणे महसुली उत्पन्न वजा जाता बांधिल खर्च वेगळा करून ५ टक्के निधी राखीव ठेवावयाचा आहे. सन २०१२-१३ मध्ये ९.७ कोटी रुपये २०१३-१४ मध्ये १३.७२ कोटी रुपये, २०१४-१५ मध्ये ५.९१ कोटी रुपये तरतूद करण्यात आली होती. ही संपूर्ण रक्कम ५ टक्क्यापेक्षा जास्त आहे. सन २०१२-१३ मध्ये ५.६७ कोटी रुपये, २०१३-१४ मध्ये ३.३६ कोटी रुपये व २०१४-१५ मध्ये ५.५४ कोटी रुपये खर्ची पडले आहेत. समितीने ही रक्कम कुठे खर्च करण्यात आली, निधी खर्च झालेला नाही अशी माहिती मिळाली आहे? ५ टक्के निधी तुमचा आहे, त्याशिवाय स्टेटच्या समाजकल्याण विभागाचाही निधी येत असतो. समाजकल्याण विभागाची विशेष घटक योजना आहे. नागरी दलित वस्ती सुधारणेसाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत निधी मिळतो, इतर कामांसाठी मिळत नाही. समितीने योजना कोणत्या राबवावयाच्या याबद्दल समितीचे काही म्हणणे नाही. परंतु उपलब्ध झालेला निधी पूर्णतः खर्च करू शकलेला नाहीत. २०१२ पासून निधी शिल्लक आहे. सेसचा निधी व्यपगत झाला का? अशी विचारणा केली असता आयुक्तांनी सांगीतले की, आम्ही २०१२-१३ मध्ये नागरी दलित वस्ती सुधारणेसाठी २० लाख रुपये, २०१३-१४ मध्ये ६० लाख रुपये व २०१४-१५ मध्ये ६० लाख रुपये तरतूद केली होती. दुर्दैवाने हा पैसा पूर्णतः खर्च झालेला नाही, कमी खर्च झालेला आहे. शहर अभियंता यांनी समितीस माहिती दिली की, नवी मुंबई महानगरपालिका हे शहर सिडकोने प्लॅन केलेले आहे. ८ चौ.कि.मी. क्षेत्रात झोपडपट्टी वस्त्या आहेत. संमिश्र प्लॅनमध्ये असल्यामुळे सन २००० मध्ये महानगरपालिकेकडून सर्वेक्षण करण्यात आले. बेलापूर, नेरूळ, दिघापर्यंत वस्त्या सर्टिफाय केल्या आहेत. महापालिकेच्या क्षेत्रात शहर आल्यानंतर बजेटमध्ये निधी दिला जात होता व तो खर्च होत होता. दलित वस्तीसाठी जो निधी येतो तो खर्च होतो. महापालिका क्षेत्रात सर्व इन्फ्रास्ट्रक्चर तयार केलेले होते. त्यामुळे निधी कुठे खर्च करावा हा प्रश्न आहे. सन २०१२-१३ मध्ये झालेल्या कामाची बिले राहिली आहेत, ती कार्यकारी अभियंत्यांनी फायनल केली पाहिजेत असे सांगितले आहे. काही ठिकाणी पॅच आहेत. ते घेण्यासाठी निधी उपलब्ध होता. पाणी, लाईट, रस्ते, कॉंक्रिटीकरणाची कामे झाली आहेत. २०१२ चे कॉन्ट्रॅक्टरचे पैसे द्यायचे राहिले आहेत. सीबीडी बेलापूर व जय दुर्गा माता नगर येथे पदपथ व गटाराची कामे झाली आहेत. १५ दिवसात अंतिम करून युटिलिटी सर्टिफिकेट सादर करू. २०१४-१५ चा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविला आहे. दुसरा प्रस्ताव महासभेपुढे आहे. अशी माहिती दिली.

समितीने २०१३-१४ ची प्रगतीपथावरील कामे आहेत. अंदाजपत्रक १५.११ लाख रुपये असताना झालेला खर्च १६.५४ लाख रुपये आहे? असे विचारले असता शहर अभियंता यांनी सुधारित

माहिती दिली की, सन २०११-१२ मध्ये सर्व कामे झाली असून रक्कम शिल्लक नाही. २०१३-१४ मध्ये ऐरोली येथील काम झाले आहे. एस्टीमेट ॲप्रॉक्सीमेंटली काढले जाते, परंतु प्रत्यक्ष मोजमाप केल्यानंतर त्यामध्ये फरक पडतो. हे काम झालेले आहे. मोजमाप करताना रक्कम तेवढीच होती. शेवटी दोन कामे पूर्ण झाली आहेत. त्यांची बिले द्यायला सांगितले आहे. त्यानंतर आम्ही युटिलिटी सर्टिफिकेट सादर करतो. हा निधी पुनर्वसन कामासाठी येतो. मेन्टेनन्ससाठी निधी दिला तर दरवर्षी खर्च होऊ शकतो अशी माहिती दिली. यावर समितीने असे सांगीतले की, आपण तसा प्रस्ताव तयार करावा. अनुसूचित जातीसाठी या महापालिका क्षेत्रात मर्यादित एरिया आहे. मागणी पूर्ण झाली असेल आणि निधी शिल्लक रहात असेल तर झालेल्या कामाच्या मेन्टेनन्ससाठी आम्हाला परवानगी मिळावी असा प्रस्ताव पाठवावा.

समितीने सिडकोच्या मागासवर्गीयांसाठी सोसायट्या आहेत. काही इमारतींमध्ये ६५ टक्के लोक अनुसूचित जातीचे आहेत. जेथे मागासवर्गीय लोक राहतात त्यांच्यासाठी निधी खर्च करावा असे सुचविले. आयुक्त यांनी असे विदित केले की, नवी मुंबई महानगरपालिकेची एकूण लोकसंख्या ११ लाख २० हजार एवढी आहे. त्यात अनुसूचित जातीच्या लोकांची संख्या १ लाख ६७ हजार इतकी आहे, तर अनुसूचित जमातीच्या लोकांची संख्या १८ हजार आहे. येथे वैयक्तिक लाभाच्या २२ योजना राबविण्यात येतात. सन २०१५-२०१६ मध्ये चांगला खर्च झालेला आहे. समितीने सन २०१६-१७ मध्ये जास्त निधी खर्च करावा असे आम्हाला वाटते दलित वस्तीला जोडणारे रस्ते असतील ते देखील आपल्याला चांगले करता येतील. तेथे स्ट्रीट लाईट घेता येईल. एवढेच नव्हे तर दलित वस्त्यांमधून ग्रंथालये घेण्यात यावीत. आय.ए.एस., एम.पी.एस.सी.सारख्या स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण देखील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना देता येईल. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी ॲकेडमी काढण्यासाठी देखील निधी खर्च करता येईल. पाणी, रस्ते, शिक्षण, एमपीएससी, युपीएससी स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थी बसतात. त्यांना आपण मदत करावी. एवढेच नव्हे तर दलित वस्तीमध्ये वर्तमानपत्र देखील आपल्याला देता येतील. आमचे एवढेच म्हणणे आहे की, दलित वस्तीच्या विकासासाठी जो निधी येतो तो दलितांवर खर्च केला पाहिजे. तो निधी शिल्लक राहता कामा नये. या निधीचा विनियोग आपण कसा केला आहे त्याचा अहवाल समितीला नंतर लेखी स्वरूपात सादर करावा, असे सुचित केले.

**विभागीय सचिवांची साक्ष**

अनुसूचित जाती कल्याण समितीने दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी नवी मुंबई महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने समितीने नवी मुंबई महानगर पालिके संबंधित अधिका-यांना प्रत्यक्ष भेटीच्या वेळी दिनांक ९ नोव्हेंबर, २०१६ रोजी मंत्रालयीन विभागीय सचिवांची साक्ष घेतली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाला भेट देऊन स्मारकाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कालबद्ध कार्यक्रम आखण्याचे सुचविले होते. याबाबत काय कार्यवाही झाली? अशी विचारणा केली असता अतिरिक्त आयुक्त यांनी सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या डोमच्या कॉंक्रीटींगचे काम पूर्ण झाले आहे. स्मारकाच्या डोमसाठी मार्बल बसविण्याबाबत आय.आय.टी., व्हि.जे.टी.आय. व सिडको यांची संयुक्त तांत्रिक समिती गठीत करण्यात आली होती. त्या समितीने डोमला मार्बल बसविण्याची परवानगी दिली नाही. त्या समितीने मार्बलच्या बदल्यात दोन-तीन पर्याय सुचविले आहेत. त्या समितीचा अहवाल मान्यतेसाठी महापालिकेच्या महासभेसमोर ठेवण्यात येईल. महापालिकेने मान्यता दिलेल्या पर्यायानुसार स्मारकाच्या डोमचे काम करण्यात येईल. तद्नंतर फिनिर्शींगचे काम पूर्ण करुन घेण्यात येईल. संयुक्त तांत्रिक समितीने मार्बल लावण्यास परवानगी दिली नाही. त्यामुळे मार्बल लावण्याच्या कामास स्थगिती देण्यात आली आहे. त्या समितीने मार्बलच्या बदल्यात अन्य पर्याय सुचविले आहेत. त्यामध्ये चांगल्या पेंटचा वापर करण्याचा पर्याय दिलेला आहे. महासभा जो पर्याय स्वीकारेल त्यानुसार काम करण्यात येईल.

समितीने संयुक्त तांत्रिक समितीस जे पर्याय दिले आहेत त्यातील एखाद्या पर्यायाला महासभेने मंजुरी दिली तर महापालिकेकडून स्मारकाचे काम तातडीने सुरु करण्यात येईल काय? अशी विचारणा केली असता, अतिरिक्त आयुक्तांनी होय. मी समितीसमोर जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. संयुक्त समितीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या डोमला मखराना मार्बल लावणे तांत्रिकदृष्ट्या योग्य ठरणार नसल्यामुळे आयुक्तांनी सदरहू काम थांबविले आहे. मी पुन्हा सांगतो की, संयुक्त समितीने जो अहवाल दिलेला आहे तो महापालिकेच्या महासभेसमोर ठेवण्यात येईल. संयुक्त समितीने मार्बल ऐवजी अन्य पर्यायांचा वापर करण्याचे सुचविले आहे. त्या पर्यायांपैकी एका पर्यायास महासभेने मान्यता दिल्यानंतर त्यानुसार स्मारकाच्या डोमचे काम करण्यात येईल. मीडियातून प्रसारित होत असलेले वृत्त आणि अधिकारी देत असलेली माहिती यामध्ये तफावत आढळून येते. अशा परिस्थितीत समितीने नेमके कोणाचे म्हणणे खरे मानायचे? अतिरिक्त आयुक्त सांगत आहेत की, स्मारकाच्या कामामध्ये भ्रष्टाचार झालेला नाही. परंतु मीडियाच्या माध्यमातून सांगण्यात येत आहे की, स्मारकाच्या कामामध्ये भ्रष्टाचार झाला आहे. त्यामुळे आयुक्तांनी सदरहू स्मारकाचे काम

थांबविले आहे. परंतु अतिरिक्त आयुक्त सांगत आहेत की, या कामामध्ये भ्रष्टाचार झाला नसून, सदरहू काम उत्कृष्ट झालेले आहे. मीडिया, आयुक्त आणि अतिरिक्त आयुक्त यांच्या सांगण्यात तफावत असल्यामुळे प्रशासनाकडून एकप्रकारे समितीची दिशाभूल केली जात आहे, असे समितीला वाटते. संयुक्त समितीचा अहवाल आयुक्तांच्या स्वाक्षरीनिशी समितीला उपलब्ध करुन द्यावा.

समितीच्या भेटीच्या वेळी महापालिकेने निदर्शनास आणून दिले होते की, विकास विषयक कामांसाठी सिडकोकडून महापालिकेला जागा उपलब्ध होणार आहे. समिती जाणून घेऊ इच्छिते की, महापालिकेला जागा मिळाल्या आहेत काय? तसेच, महापालिका क्षेत्रात शिक्षकांची अनेक पदे रिक्त आहेत. ही पदे भरण्याबाबत सुद्धा कार्यवाही करावी. तसेच, समितीच्या भेटीच्या वेळी महापालिकेमध्ये अनुसूचित जाती प्रवर्गातील पदोन्नतीचे उप अभियंता हे पद रिक्त असल्याचे निदर्शनास आले होते. सदरहू पद भरण्यात आले आहे काय? अशी विचारणा केली असता, ती पदे भरण्यात येतील, अनुसूचित जाती प्रवर्गात पदोन्नतीमध्ये उप अभियंता हे पद रिक्त होते. महापालिकेने सदरहू पद उक्त प्रवर्गातून भरण्याचा प्रयत्न केला, परंतु या पदासाठी पात्र उमेदवार उपलब्ध झाला नाही. महापालिकेची अनुशेष भरण्याची कार्यवाही सुरु आहे. जर अनुसूचित जाती प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध झाला तर उप अभियंत्याचे रिक्त असलेले पद भरण्यात येईल. समितीने जर पात्र उमेदवार मिळाला नाही तर आपण पद रिक्त ठेवणार काय किंवा सदरहू पद सरळ सेवेने भरणार काय? असे समितीने विचारले असता, उप अभियंता हे पद पदोन्नतीचे असल्यामुळे ते बाहेरुन भरता येणार नाही. जोपर्यंत अनुसूचित जाती प्रवर्गातून पात्र उमेदवार उपलब्ध होत नाही तोपर्यंत हे पद भरता येणार नाही.

समितीने नवी मुंबई महानगरपालिकेचे रोस्टर कोकण विभागीय आयुक्त कार्यालयातील मागासवर्ग कक्षाकडून तपासून घेण्यात आले आहे काय अशी विचारणा केली असता, आरोग्य आणि अग्निशमन विभागाच्या रोस्टरची तपासणी पूर्ण झालेली आहे. उर्वरित विभागाच्या आकृतिबंधास मान्यता मिळाल्यानंतर रोस्टर तपासून घेण्यात येईल. श्रीमती संध्या अंबादे या महापालिकेमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी त्यांच्यावर झालेल्या अन्यायाबाबत समितीला निवेदन दिले होते. उक्त निवेदनाच्या अनुषंगाने श्रीमती अंबादे यांना २०१२ मध्ये सहायक आयुक्त पदावर पदोन्नती दिली आहे. त्यांनी २००६ पासून मानीव दिनांक मिळण्याबाबत मागणी केली होती. परंतु त्यांना २००६ पासून मानीव दिनांक देता येत नाही असे प्रशासनाचे मत झालेले आहे आणि त्यांना तसे कळविण्यात आलेले आहे. महापालिकेने २०१५ च्या आदेशान्वये श्रीमती अंबादे यांना २०१२ पासून तात्पुरती पदोन्नती दिली आहे. या प्रकरणी विधी व न्याय विभागाचे मत घेण्यात आलेले आहे. विधी व न्याय विभागाने अभिप्राय दिला आहे की, श्रीमती अंबादे यांना २००६ पासून मानीव दिनांक देणे अनुज्ञेय नाही.

समितीने नवी मुंबई महापालिकेमध्ये घनकचरा सफाईचे काम कंत्राटी पद्धतीने देण्यात येते. सदरहू काम करण्यासाठी महापालिकेकडे कायमस्वरुपी कर्मचारी आहेत काय? साफसफाईचे काम कंत्राटी पद्धतीने कंत्राटदाराला देण्यात येते. कंत्राट मिळण्यासाठी कंत्राटदाराला टेंडर भरावे लागते. यामध्ये मागासवर्गीय कंत्राटदाराने भाग घेतल्यास त्याला प्राधान्य देण्यात येते काय अशी विचारणा केली असता, उप आयुक्तांनी असे सांगीतले की, साफसफाईचे काम कंत्राटी पद्धतीने करण्याबाबत आऊटसोर्सिंग केलेले आहे. कंत्राटदारांच्या माध्यमातून साफसफाईचे काम करुन घेण्यात येते. तसेच खुल्या स्पर्धेद्वारे साफसफाईचे काम कंत्राटदारांना देण्यात येते. त्यामुळे मागासवर्गीय कंत्राटदाराला प्राधान्य देण्यात येत नाही. तसेच, कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवश्यक असलेले सर्व साहित्य पुरविण्यात येते. तसेच सफाई कामगारांची आरोग्य तपासणी सुद्धा वेळोवेळी करण्यात येते. एकंदरीत सफाई कामगारांचे शोषण होणार नाही या बाबत प्रशासनाकडून काळजी घेण्यात येते. महापालिकेच्या माध्यमातून कंत्राटदाराला पेमेंट करण्यात येते. परंतु कंत्राटदार सफाई कामगारांना वेळेवर पगार देतात की नाही, या बाबत आपण खातरजमा करता काय? अशी समितीने विचारणा केली असता, या मुद्याची आम्ही नोंद घेतो असे आयुक्तांनी नमूद केले. दिवाळीपूर्वी सफाई कामगारांना उशिरा पगार मिळाल्याबातचा मुद्दा निर्माण झाला होता. परंतु आता तो इश्यू राहिला नाही असेही आयुक्तांनी सांगितले. समितीने महापालिकेने घालून दिलेल्या अटी व शर्तीनुसार कंत्राटदार काम करीत आहे की नाही, हे पाहण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. तसेच सफाई कामगारांना कंत्राटदाराकडून वेळेवर मासिक पगार दिला जातो की नाही, हे बघण्याची जबाबदारी सुद्धा महापालिकेचीच आहे. सफाई कामगारांच्या पगारातून पी.एफ. कपात होतो की नाही, त्यांचा विमा काढण्यात आला की नाही हे देखील पाहिले पाहिजे असे समितीने सूचित केले.

तसेच, समितीने अपेक्षा व्यक्त केली की, सफाई कामगारांना देण्यात येणाऱ्या सुविधा आणि पगाराच्या बाबतीत महापालिकेने मॉनिटरींग करावे. समितीने आपण कॉन्ट्रॅक्टरला टेंडर देतो त्यावेळी लेबर इन्शूरन्स आणि पीएफ आहे किंवा नाही हे बघणे गरजेचे आहे. त्यांनी इन्शूरन्स भरलेला आहे किंवा नाही याची खात्री करुनच आम्ही त्यांना बिल देतो. समिती प्रमुखांनी सांगितले की, मी तेथे जवळच राहतो. परंतु, मला तेथे कोणताही कामगार हॅन्डग्लोज किंवा गमबूट घालून काम करताना दिसला नाही. आपण मघाशी सांगितले की, कॉन्ट्रॅक्टर साहित्य पुरवितो. मग महानगरपालिकेचा काय संबंध आहे ? साहित्य पुरविले किंवा नाही हे आपण बघणार का कॉन्ट्रॅक्टर बघणार आहे ? अशी विचारणा केली असता, उप आयुक्त यांनी आपण साहित्य दिलेले आहे. त्यांनी कामगारांना साहित्य पुरवावे असे आपण अटी व शर्तीनुसार त्यांना बंधनकारक केलेले आहे व महानगरपालिकेचे सुपरवायझर हे बघतात, असे नमूद केले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**(१)** समितीने नवी मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागात वैद्यकीय व तत्सम संवर्गातील पदे निर्माण करण्याकरीता सादर केलेल्या आकृतीबंधाच्या प्रस्तावास शासनाच्या आरोग्य विभागाने तातडीने मान्यता देण्याची आवश्यकता असल्याचा अभिप्राय व्यक्त केला. **अनुसूचित जातीच्या उमेदवारांना महानगरपालिकेच्या सेवेचा लाभ मिळण्यासाठी शासनाच्या आरोग्य विभागाने वैद्यकीय व तत्सम संवर्गातील पदे भरण्यास तात्काळ मान्यता द्यावी व त्याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(२)** नवी मुंबई महानगरपालिकेने " नवी मुंबई सेवाभरती व सेवेचे परिरक्षण नियम, २००८ " तयार केले असून सदर सेवा प्रवेश नियमांचा प्रस्ताव दिनांक १९ डिसेंबर, २००९ रोजी जनरल बॉडी पुढे सादर करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची " ड " प्रकरण २ (क) मधील तरतुदीनुसार प्रस्तावित सेवाप्रवेश नियम शासनाकडे दिनांक ११ एप्रिल, २०१४ रोजी पाठविण्यात आलेले असतानाही व त्रुटींची पूर्तता करूनही सदरहू प्रस्ताव मंजूर करण्यास शासनाकडून विलंब होत असल्याचा अभिप्राय समितीने व्यक्त केला. **शासन मान्यते अभावी अनुसूचित जातीच्या अधिकारी व कर्मचा-यांवर अन्याय होणार असल्यामुळे शासनाने प्रस्तावित सेवा प्रवेश नियमांना तात्काळ मान्यता द्यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(३)** समितीने नवी मुंबई महानगरपालिकेला दिनांक २७ एप्रिल, २०१६ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी ऐरोली येथील सेक्टर १५, भुखंड क्रमांक २२ ए, वरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकास भेट देऊन स्मारकाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कालबद्ध कार्यक्रम आखण्याचे व तांत्रिक समितीने शिफारस केलेल्या पर्यायांपैकी महासभा जो पर्याय स्वीकारेल त्यानुसार काम करावे असा अभिप्राय व्यक्त केला. **महानगरपालिकेने सदर स्मारकाच्या बांधकामाची संपूर्ण माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत सादर करावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

१२

## सिडको, नवी मुंबई

समितीने मंजूर पदांपैकी तांत्रिक व अतांत्रिक स्वरूपाची वर्गनिहाय किती व कोणती पदे अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत, त्यापैकी किती व कोणकोणती पदे भरण्यात आली आहेत व कोणकोणती पदे रिक्त आहेत, सदर पदे रिक्त राहण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत? ही पदे भरण्यासाठी जाहिरात दिली होती काय? अशी विचारणा केली असता, कार्मिक व्यवस्थापक यांनी अशी माहिती दिली की, १७४ रिक्त पदांचा तपशील उत्तरामध्ये नमूद केला आहे. त्यापैकी ९६ पदे भरण्यात आली आहेत व वर्ग १ ते ४ मधील ७८ पदे रिक्त आहेत.

समितीने वर्ग १ मध्ये ६ तांत्रिक पदे रिक्त होती. सदर पदासाठी पात्र उमेदवार प्राप्त झाला नाही असे म्हटले आहे. सरळ सेवेची पदे भरण्यासाठी महाराष्ट्रामध्ये उमेदवार मिळत नाहीत का? या पदाचे क्वालिफिकेशन काय आहे? अशी विचारणा केली असता कार्मिक व्यवस्थापक यांनी व्यवस्थापक सहाय्यक परिवहन अभियंता व उप नियोजनकार या पदासाठी क्वालिफाईड लोक महाराष्ट्रात फार कमी आहेत. समितीने ट्रान्सपोर्ट इंजिनिअर आणि टाऊन अँड प्लॅनिंग या पदासाठी एम.टेक पाहिजे, या शिक्षणाचे कॉलेज कुठे आहे? पुणे येथे आहे असे स.का.अ (भरती) यांनी सांगितले. समितीने तुम्ही त्या कॉलेजशी संपर्क केला का? शेवटच्या वर्षाला शिक्षण घेणाऱ्या उमेदवारांशी संपर्क साधता आला असता. या पदाकरिता कोणत्या वृत्तपत्रात जाहिरात दिली? असे विचारले असता, असे निश्चित केले व्यवस्थापकांनी इंडियन एक्स्प्रेस आणि लोकसत्ता या दैनिकामध्ये जाहिरात देण्यात आली होती असे सांगितले. समितीने आपण दिनांक ५ मार्च २०१४ ते ५ एप्रिल २०१६ या कालावधीत जाहिरात दिलेली आहे. याचा अर्थ समितीचे पत्र आल्यानंतर आपण जाहिरात दिलेली आहे हे खरे आहे काय व सदर पदे केव्हा पासून रिक्त आहेत? अशी विचारणा केली असता कार्मिक व्यवस्थापक यांनी व्यवस्थापका येथे आपले पत्र दिनांक ४ एप्रिल २०१६ रोजी आले असून आमची जाहिरात दिनांक ५ एप्रिल २०१६ रोजी आलेली आहे. सदर पदे ही १९९७ पासून रिक्त आहेत, अशी माहिती दिली. समितीने १९९७ पासून आपल्याकडे पदे रिक्त असताना आपण दिनांक ५ मार्च २०१४ रोजी जाहिरात दिलेली आहे असे नमूद केले असता सहाय्यक कार्यकारी अधिकारी यांनी १९९७ मध्ये १७४ पदे रिक्त झालेली आहे. “ क ” व “ ड ” वर्गाची शेवटची भरती सन १९९७ मध्ये झाली होती अशी माहिती दिली. समितीने मुख्य अभियंता, वरिष्ठ नियोजनकार ही पदे केव्हा रिक्त झालेली आहेत, ही पदे भरण्यासाठी आपण केव्हा कारवाई केली आहे त्याची माहिती समितीला द्यावी, असे सांगीतले असता सहाय्यक कार्यकारी अधिकारी यांनी मुख्य अभियंता, वरिष्ठ नियोजनकार ही पदे सन २००८ मध्ये रिक्त झालेली आहेत, असे सांगीतले. समितीने ८ वर्ष मुख्य

अभियंता हे पद न भरण्याचे कारण काय आहे अशी विचारणा केली असता व्यवस्थापक यांनी ही प्रमोशनची पदे आहेत असे सांगीतले. सरळसेवेची पदे सरळसेवेने भरावयाची आहेत. पदोन्नतीची पदे ही पदोन्नतीने भरावयाची असतात. असे असताना आपण मुख्य अभियंता हे पद भरण्यासाठी ८ वर्षामध्ये कोणती कारवाई केली आहे? अशी समितीने विचारणा केली तसेच, तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील एकूण ३६० पदे आहेत. त्यापैकी १७४ पदे रिक्त आहेत. याचा अर्थ ५० टक्क्यांपेक्षा जास्त पदे रिक्त ठेवली आहेत. हे आपण जाणीवपूर्वक ठेवले आहे काय? तसेच समितीने सदर पदे आपण जाणीवपूर्वक रिक्त ठेवली नसतील तर सदर पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत, अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेले रोस्टर मागास वर्ग कक्षाने तपासले आहे काय? अशी विचारणा केली त्यावर व्यवस्थापक यांनी सांगीतले की, सन १९७० पासून अनुसूचित जातीचे रोस्टर ठेवण्यात आले आहे. सिडकोचे सन २०१३ मध्ये रोस्टर तपासलेले आहे व निश्चित केले.

समितीने दिनांक १६ मार्च, २०११ रोजी नमूद केल्याप्रमाणे एकही पद भरले नसल्यामुळे अनुशेष निरंक आहे. सरळ सेवेची भरती करताना दिनांक १८ ऑक्टोबर, १९९७ च्या शासन निर्णयानुसार मागासवर्गीय आरक्षणाची ५२ टक्के मर्यादा पाळलेली नाही. २०१३ मध्ये रोस्टर तपासून घेतले त्यावेळी हे रिमार्क्स दिलेले आहेत असे सूचित केले त्यावर, व्यवस्थापक यांनी मंजूर पदे २७९६ असली तरी १४०५ पदे भरली आहेत. ५० टक्के पदे रिक्त आहेत. आमच्याकडे १९९७ पासून प्रकल्पग्रस्तांची भरती करण्याला विरोध होता, असे सांगितले.

समितीने अनुसूचित जातीच्या प्रवर्गाचा अनुशेष भरू नये असे म्हटले आहे का? असेल तर समितीला पत्र दाखवा. अंमलबजावणी केली नसेल तर ती तुमची चूक आहे. मागासवर्गीयांचा अनुशेष भरून काढायचा आहे हे आपण त्यांना कळविले का? अशी विचारणा केली त्यावेळी व्यवस्थापक यांनी उधृत केले की, मी पार्श्वभूमी सांगू इच्छितो. प्रकल्पग्रस्तांचा भरतीसाठी विरोध होता. भरतीची जाहिरात प्रसिद्ध झाली की ते विरोध करायचे. अनेकदा भरती करण्यास त्यांनी विरोध केल्यामुळे आम्ही पदे भरू शकलो नाही. समितीने तुमच्याकडे प्रकल्पग्रस्तांचे लेखी पत्र आहे का? त्यांनी लेखी स्वरूपात काय निवेदन दिले ते आम्हाला ताबडतोब सादर करा. तसेच मागासवर्गीयांची पदे भरणे बंधनकारक आहे. शासनाने वेळोवेळी आदेश दिलेले आहेत. प्रकल्पग्रस्तांचा विरोध असला तरी त्यामधील अनुसूचित जातीच्या लोकांचा विचार करता आला असता. असे नमूद केले असता व्यवस्थापक यांनी २०१२ मध्ये शासनाने भरती करण्यावर स्टे आणला होता. नंतर या आंदोलनामुळे २०१३ मध्ये शासनाने तो स्टे उठविला. व्यवस्थापकीय संचालक श्री.भाटिया व सह व्यवस्थापकीय संचालक श्रीमती राधा यांनी प्रयत्न करून शासनाकडून भरतीसाठी मंजुरी मिळविली, असे सांगीतले.

समितीने विचारणा केली की, प्रकल्पग्रस्तांचा संबंध काय? त्यांनी म्हटले ते तुम्ही ऐकायचे आणि तुमचे म्हणणे त्यांनी ऐकायचे असे चालले आहे का? शासनाचे धोरण राबविणार नाही का? याबाबत व्यवस्थापक यांनी सांगितले की, शासनाने सिडकोला दिनांक १२ मार्च, २०१२ रोजी पत्र पाठविले होते. सिडकोमधील भरती प्रक्रिया स्थगित करण्याबाबत ते पत्र होते.

समितीने हा स्टे उठविण्यासाठी काय प्रयत्न केले? स्टे उठविला गेला तर पदे भरता येतात. तुम्ही शासनासमोर वस्तुस्थिती ठेवली का? तुम्ही १७४ लोकांवर इतकी वर्षे अन्याय केलेला आहे असे सांगीतले असता व्यवस्थापकांनी सन २०१२ मध्ये पदभार घेतल्यानंतर आम्ही पदांचा आढावा घेतला. २०१४ नंतर आम्ही प्रयत्न सुरू केले. २०१४ पासून पदे भरण्याचा प्रयत्न केला अशी माहिती दिली.

समितीने सिडकोमध्ये अनुसूचित जातीचा अनुशेष ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे असे असताना आपण खाजगीकरणाच्या माध्यमातून सिडकोमधील कामे करीत आहात. तेव्हा आपण यासंबंधातील तपशीलवार माहिती समितीला सादर करावी असे निदेश दिले असता व्यवस्थापकांनी सिडकोमध्ये अनुसूचित जातीची किती पदे रिक्त आहेत यासंबंधातील सर्व तपशीलवार माहिती समितीला लेखी स्वरुपात नंतर सादर करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

समितीने सिडकोमध्ये अनुसूचित जातीच्या उमेदवारांचा ५० टक्के अनुशेष आहे. सदर पदे भरलेली नसल्यामुळे सचिवांना साक्षीसाठी बोलाविण्यात यावे असेही निदेश समितीने दिले. सिडकोमार्फत घरे बांधण्यात येतात त्यात अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी घरे राखीव असतात काय? तसेच आपण मागासवर्गीयांसाठी कॉलनी बांधलेल्या आहेत. तसेच एनआरआयसाठी इमारती बांधलेल्या आहेत. अशा प्रकारे आपण ज्या उच्च उत्पन्न गटासाठी जी घरे बांधली आहेत त्या इमारतींमध्ये अनुसूचित जातीच्या लोकांसाठी आरक्षण ठेवले आहे काय? सिडकोतर्फे बांधण्यात आलेल्या निरनिराळ्या गृहनिर्माण वसाहतींमधील स्टॉल्स, उपाहारगृहे इत्यादी व्यापारी तत्त्वावर देण्यात येणाऱ्या गाळ्यांचे वाटप करण्यासाठी कोणत्या पद्धतीचा अवलंब करण्यात येतो अशी विचारणा केली असता व्यवस्थापक यांनी व्हॅलिशिल्प, स्वप्नपूर्ती सारख्या ज्या घरकुल योजना आहेत त्यातील इमारतींमध्ये अनुसूचित जातीसाठी ११ टक्के गाळे हे अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवलेले आहेत अशी माहिती दिली.

समितीने सिडकोच्या मालकीच्या जागेवर शिक्षण संस्थांना शैक्षणिक प्रयोजनासाठी भूखंड/ इमारती वाटप करण्यात आल्या आहेत काय? असल्यास कोणकोणत्या शैक्षणिक संस्थांना तसेच

त्यापैकी मागासवर्गीय शिक्षण संस्था किती व कोणकोणत्या आहेत? शैक्षणिक संस्थांना भूखंड देण्याबाबत सिडकोने पॉलिसी निश्चित केली आहे. मागासवर्गीय शैक्षणिक संस्थांसाठी प्लॉट राखीव ठेवले आहेत का? अशी विचारणा केली असता व्यवस्थापक यांनी १३६ भूखंड अलॉट केले आहेत. ज्या शैक्षणिक संस्था नियम व अटींची पूर्तता करतात त्यांनाच भूखंडाचे वाटप केले आहे. १३६ संस्थांची सूची उपलब्ध आहे, समितीला ती सादर करतो, असे आश्वासन दिले.

**विभागीय सचिवांची साक्ष :**

व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी समितीस अशी माहिती दिली की, सिडकोमध्ये एकंदरीत तांत्रिक आणिअतांत्रिक संवर्गामध्ये एकूण ३६० पदे आहेत. ज्यावेळी समितीने सिडकोला भेट दिली त्यावेळेस १७४ पदे रिक्त होती. एवढ्या मोठ्या प्रमाणावर पद रिक्त ठेवणे उचित नाही याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर सिडकोने सदर पदे भरण्यासाठी विशेष मोहीम हाती घेतली आणि एप्रिल, २०१६ पासून १७४ पदांपैकी ९४ पदे भरण्यात येऊन उमेदवार कामावर हजर झालेले आहेत. आणखी १४ पदे पुढील एक महिन्यात भरण्यात येणार आहेत. दरम्यानच्या काळात पनवेल महानगरपालिका स्थापन झाली आणि यानंतर सिडकोकडे कामोठे, कळंबोली, खारघर आणि नवीन पनवेल हा सर्व भाग पनवेल महापालिकेमध्ये हस्तांतरित झाल्यामुळे जवळपास २५ ते ३० पदांची आवश्यकता नाही. म्हणून ही पदे एकतर रिक्त करावी लागतील किंवा पनवेल महापालिकेकडे हस्तांतरित करावी लागतील. त्यामुळे सदर पदे शासनाला भरता येणार नाहीत.

समितीने पनवेल महानगरपालिका झाल्यापासून ही पदे भरता आलेली नाहीत. परंतु हा बॅकलॉक भरुन काढावा लागेल. जो १७४ पदांचा बॅकलॉक होता त्यामध्ये कोणता पॅटर्न होता, अशी विचारणा केली असता व्यवस्थापकीय संचालक यांनी पनवेल महानगरपालिकेला शासनाचे जे निकष आहेत त्या स्टाफिंग पॅटर्न नुसार महापालिकेला वेगळे रोष्टर ठेवावे लागेल आणि वेगळ्या पद्धतीने पद भरती करावी लागेल. ज्या पदांची शासनाला आवश्यकता नाही आणि भरलेली नाहीत ती सिडकोकडून कमी करण्यात येतील.पनवेल महानगरपालिका शासनाच्या निकषानुसार ही पद भरती करेल, असे सांगितले.

व्यवस्थापकीय संचालक यांनी असे सांगितले की, स्टाफिंग पॅटर्नप्रमाणे १७४ पदांपैकी ९६ पदे भरलेली आहेत आणि १४ पदे आणखी भरली जातील. म्हणजे एकूण ११० पदे भरली जातील आणि उरलेल्या पदांपैकी किती रद्द करावी लागतील याचा आढावा घेण्यात येईल. साधारणतः २५ ते ३० पदे रद्द करावी लागतील असा अंदाज आहे. त्यानंतर जी २५ ते ३० पदे शिल्लक राहतील ती विशेष मोहीम आणि जाहिरात देऊन भरण्याचे आयोजन करण्यात येईल, अशी माहिती दिली.

समितीने या पदांना मंजूरी मिळाल्यानंतर पनवेल महानगरपालिका झाली. जीअतिरिक्त पदेआहेत ती मंजूर असून का भरलेली नाहीत? मंजूर झालेल्या पदांची आजची अवस्था काय? असे विचारले असता, प्रधान सचिवांनी शासनाने वित्त विभागाच्या संमतीने सिडकोला कळविलेले आहे की, ठराविक कालावधीनंतर रिक्त पदांचा आढावा घेण्यात यावा आणि त्यांचे स्टाफिंग पॅटर्न ठरवावे. सिडकोचे काही नवीन प्रकल्प येतात आणि काही प्रकल्प पूर्ण होतात. या सर्व गोष्टींचा विचार करुन शासनाने नेमून दिलेल्या निकषानुसार सिडकोने रिक्त पदांचा वेळोवेळी आढावा घ्यावा.ज्या पदांची आवश्यकता नाही अशी २० ते २५ पदे सिडकोच्या आस्थापनेवरुन कमी होतील.ही पदे लॅप्स होतील काय आणि जी पदे भरलेली आहेत त्यांच्यावर याचा काही परिणाम होईल काय?आठ वर्षापासून ही पदे रिक्त आहेत, त्याची कारणे काय आहेत? फक्त जी रिक्त पदे आहेत त्यांचा आढावा घेण्यात येणार आहे आणि रिक्त पदांची आवश्यकता नसेल तर ती रद्द करण्यात येतील. भरलेल्या पदांवर कोणताही परिणाम होणार नाही.

व्यवस्थापकीय संचालक यांनी समितीने भेट दिल्यानंतर पद भरण्याच्या प्रक्रियेला गती आली ही वस्तुस्थिती आहे. सन २०११-२०१२ पर्यंत ही पदे नियमित भरली जात होती. त्यानंतर ही पदे भरण्यासाठी प्रकल्पग्रस्तांनी आंदोलन केले. सदर पदे ही प्रकल्पग्रस्तांमधूनच भरण्यात यावीत अशाप्रकारचे आंदोलन होते. ही पूर्ण पदे प्रकल्पग्रस्तांमधून भरता येत नाही म्हणून याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले होते. या भरती प्रक्रियेला शासनाने दोन वेळा स्थगिती दिली होती. त्यामुळे सन २०११ पासून पुढच्या चार वर्षामध्ये मागासवर्गीयांचीच नाही तर खुल्या प्रवर्गातील देखील कोणतीही पदे भरली गेली नाहीत. त्यानंतर सन २०१५-२०१६ पासून प्रवर्गनिहाय पदे भरायला सुरुवात केलेली आहे. म्हणून एप्रिल, २०१६ पासून ९६ पदे भरली गेलेली आहेत, अशी माहिती दिली.

समितीने एवढा मोठा बॅकलॉक होता म्हणून समितीने बैठकीच्या वेळेस पद भरतीबाबत मागणी केली होती.तसेच, दिनांक २८ एप्रिल, २०१६ रोजी याठिकाणी समितीने भेट दिली त्यानंतर जी काही पद भरती करण्यात आली त्यासाठी जाहिरात देण्यात आली होती काय? तसेच, टाईम्स ऑफ इंडियामधून जाहिरात दिली होती काय, अशी विचारणा केली असता.व्यवस्थापकीय संचालक यांनीवेगवेगळ्या वर्तमानपत्रातून जाहिरात देण्यात आली होती. त्यात लोकसत्ता, इंडियन एक्सप्रेस, लोकमतमधून जाहिराती देण्यात आलेल्या आहेत.टाईम्स ऑफ इंडियामधून जाहिरात दिल्याचे दिसत नाही. परंतु दैनिक सकाळ, मिड डे या वर्तमानपत्रातून जाहिरात देण्यात आलेली आहे.तसेच मुख्य अभियंता व वरिष्ठ नियोजनकार ही अनुसूचित जातीच्या उमेदवारांमधून पदोन्नतीने भरावयाची

पदे होती, ती पदे ८ वर्षापासून रिक्त आहेत. सदर पदाची पात्रता असलेली व्यक्ती मिळत नसल्याने हे पद रिक्त आहे तसेच  ट्रान्सपोर्ट इंजिनिअरचे पद रिक्त होते ते जुलै, २०१५ मध्ये पद भरलेले आहे. दोन महत्त्वाच्या पदांमध्ये हेल्थ अधिकारी पदाची जाहिरात दिनांक ३ जून, २००९ मध्ये टाईम्स ऑफ इंडियाला दिलेली होती. त्यानंतरच्या जाहिराती दै. लोकमत, दै. लोकसत्ता, मिड डे, इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रातून जाहिराती देण्यात आलेल्या आहेत. माहिती व जनसंपर्क विभागाने जे रोष्टर तयार केलेले आहे त्यानुसार वर्तमानपत्रातून जाहिराती दिल्या जातात. टाईम्स ऑफ इंडियाचे रोष्टर माहिती व जनसंपर्क विभाग घेत नाही. त्यामुळे बरेचसे शासकीय विभाग टाईम्स ऑफ इंडियाला जाहिराती देत नाहीत. ज्या-ज्या वेळेला टाईम्स ऑफ इंडियाकडून हे दर स्विकारले जातात त्या-त्या वेळेस या जाहिराती दिल्या जातात. आपल्या येथे माहिती व जनसंपर्क कार्यालयातून मिड डे, हिंदुस्थान टाईम्स, मुंबई मिरर आणि इंडियन एक्सप्रेस हे वृत्तपत्र दर स्विकारतात. म्हणून या वृत्तपत्रातून जाहिराती दिल्या जातात. टाईम्स ऑफ इंडिया काही दर स्विकारतात त्या जाहिराती दिल्या जातात अशी माहिती दिली.

समितीने पनवेल महानगरपालिका झाल्याचा एक बहाना आहे. सिडकोने स्टॅफिंग पॅटर्न तयार केलेला आहे काय ? १७४ पदे ८ ते १० वर्षापासून भरलेली नाहीत यासाठी कोण जबाबदार आहेअशी विचारणा केली असता, प्रधान सचिव नगर विकास विभाग यांनी अशी माहिती दिली की, स्टाफिंग पॅटर्न मंजूर केलेले आहे आणि त्याप्रमाणे शासनाने सिडकोला पत्र पाठविलेले आहे. एप्रिल २०१६ ते आतापर्यंत ११० पदे भरण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली असून त्यापैकी ९६ उमेदवार कामावर रुजू झालेले आहेत. राहिलेली १४ पदे डिसेंबरपर्यंत भरण्यात येतील. पद भरतीला स्थगिती दिलेली होती. सन २०१२ च्या शेवटी स्थगिती उठविण्यात आली. त्यानंतर पुन्हा बैठक होऊन सन २०१३-२०१४ मध्ये पुढे जाण्यास अनुमती मिळाली, त्याप्रमाणे ही प्रक्रिया सुरु झालेली आहे. समितीने मघाशी प्रकल्पग्रस्तांच्या संदर्भात सांगितले. वेगवेगळ्या वर्गवारीचे उमेदवार प्रकल्पग्रस्तांमधून मिळत असतील तर त्या ठिकाणाहून घ्यायला काय हरकत आहे ? यावर सचिवांनी आपले म्हणणे बरोबर आहे. परंतु त्यावेळेस नवी मुंबई प्रकल्पग्रस्तांचे आंदोलन चालू होते आणि त्यांचे म्हणणे होते की, ही सर्व पदे प्रकल्पग्रस्तांमधूनच भरण्यात यावीत असे त्यांचे निवेदन होते. अशा पद्धतीने ही सर्व पदे भरता येत नव्हती म्हणून गेल्या ४ ते ५ वर्षापासून हा विषय पेडींग होता. आर्किटेक आणि सिव्हील इंजिनिअरची जाहिरात दिनांक ८ जून, २०१६ रोजी टाईम्स ऑफ इंडियामध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती.

नवी मुंबई येथील मानस सरोवर गृह संकुलात जवळ जवळ ९८ टक्के रहिवासी हे मागासवर्गीय समाजाचे आहेत. या गृह संकुलास सिडकोकडून पाणीपुरवठा वाणीज्यिक दराने केला जात होता. ही बाब तेथील रहिवाशांनी सिडकोच्या निदर्शनास आणली असती सिडकोद्वारे त्यांना निवासी दराने पाणीपुरवठा केला जाऊ लागला मात्र निवासी दराने पाणीपुरवठा केला जात असला तरी रहिवाशांना वाणीज्यिक दराने पाणीपुरवठा देयकाच्या संबंधात तसेच या संकुलातील इमारत क्रमांक १४ व १५ या इमारतींना अद्याप भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले नसल्याच्या संबंधात समितीने विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विचारणा केली असता सिडकोच्या अधिकाऱ्यांनी व शासनाच्या संबंधित विभागाच्या सचिवांना उपरोक्त दोन्ही प्रश्नांच्या संबंधात समितीला तपासून माहिती सादर करण्याबाबत आश्वासित केले होते. तथापि, अद्यापपर्यंत सिडकोद्वारे किंवा शासनाच्या संबंधित विभागाद्वारे समितीला कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही याबाबत समितीने नाराजी व्यक्त केली आहे.

समितीने सिडकोतर्फे विविध प्रयोजनार्थ भूखंड दिले जातात. तसेच, व्यापारी तत्वावरील गाळे देखील बांधले जातात. त्यामध्ये अनुसूचित जातीसाठी काही आरक्षण ठेवण्यात आले आहे का? असा प्रश्न केला असता, व्यवस्थापकीय संचालकांनी असे सांगीतले की, सिडकोच्या नियमानुसार गृहनिर्माण संस्थांसाठी भूखंड वितरित केले जातात. अशा गृहनिर्माण संस्थांमध्ये किमान ११ टक्के सभासद हे मागासवर्गीय असले पाहिजेत, अशी अट आहे. त्याचप्रमाणे व्यापारी गाळ्यांसाठी देखील मागासवर्गीयांसाठी राखीव कोटा ठेवला जातो. सिडकोचा व्हॅली शिल्प हा मोठा प्रकल्प आहे. त्यामध्ये एकूण ४२ व्यापारी गाळे आहेत. त्यापैकी ५ गाळे अनुसूचित जातीसाठी राखीव ठेवण्यात आले होते. ४ गाळ्यांचे वाटप करण्यात आले असून एका गाळ्याच्या संदर्भात निविदा मागविण्याची कार्यवाही सुरु आहे. भूखंड वाटपामध्ये आरक्षण ठेवण्यात आलेले नाही. परंतु, भूखंडाची मागणी करणाऱ्या संस्थेमध्ये ११ टक्के सभासद हे मागासवर्गीय असले पाहिजेत, अशी अट आहे. अशाच प्रकारची कार्यपद्धती शासनामध्ये आणि म्हाडामध्ये आहे व तीच कार्यपद्धती सिडकोने स्वीकारली आहे. अशा प्रकारे भूखंड राखीव ठेवण्याची तरतूद सध्याच्या नियमात नाही.

समितीने सिडकोकडून भूखंडांचा लिलाव केला जातो. त्यामधील काही भूखंड मागासवर्गीयांसाठी राखीव ठेवावेत, त्यांना प्राधान्य असावे, असे मत व्यक्त केले असता व्यवस्थापकीय संचालक यांनी शासनाच्या धोरणाप्रमाणे गृहनिर्माण संस्थेमध्ये किमान ११ टक्के मागासवर्गीय सभासद असले पाहिजेत, अशी तरतूद आहे. शासनाचे जे धोरण आहे तेच सिडकोने व म्हाडाने स्वीकारले आहे. परंतु, भूखंड आरक्षित ठेवण्याबाबत नियमात तरतूद नाही. मागील बैठकीत सह व्यवस्थापकीय संचालक यांनी सांगितले आहे की, " समितीच्या सूचनेची मी नोंद घेतली आहे. त्याप्रमाणे आम्ही सबमिट करु ". अशा प्रकारे नियमात तरतूद करावयाची असेल तर नियमात बदल करावा

लागेल.सध्या अस्तित्वात असलेल्या नियमात अशा प्रकारे आरक्षणाची तरतूद नाही, ही वस्तुस्थिती आहे. मागासवर्गीय संस्थांसाठी वेगळे अर्ज मागवावेत, अशी तरतूद नियमात नाही. त्यामुळे भूखंड आरक्षित ठेवलेले नाहीत. परंतु, जेवढे भूखंड वितरित करण्यात आलेले आहेत त्यापैकी निश्चितपणे काही मागासवर्गीय संस्थांसाठी असतील. असे किती भूखंड मागासवर्गीय संस्थांना वितरित करण्यात आले आहेत, याची यादी आम्ही समितीला सादर केलेली आहे. आता नियमात बदल करावयाचा असेल तर तो भविष्याचा निर्णय आहे. सह व्यवस्थापकीय संचालक यांनी समितीला सांगितल्याप्रमाणे ते बोर्डापुढे जातील, शासनाकडे प्रस्ताव येईल आणि त्याप्रमाणे सिडको कार्यवाही करील, असे नमूद केले असता समितीने सध्या नियमात तरतूद नाही. परंतु, ११ टक्के प्रमाणे अनुसूचित जातीसाठी भूखंड आरक्षित करण्याबाबतची मान्यता आपण शासनाकडून घ्यावी व तशा प्रकारचा प्रस्ताव शासनास सादर करावा. तसेच गृहनिर्माण विभागात जशी पद्धत आहे तशा प्रकारची पद्धत सिडकोमध्ये नाही, असे सचिवांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले आहे.गृहनिर्माण विभागाप्रमाणेच ही बाब सिडकोने आपल्या नियमांमध्ये अंतर्भूत करावी अशी समितीची मागणी असल्याबाबतचे मत समितीने व्यक्त केले. सिडकोने भूखंड वाटपाच्या बाबतीत नवीन नियम तयार करुन ते शासनाकडे पाठवावेत. या विषयावर बरीच चर्चा झालेली आहे. समितीने निदेश दिल्यानुसार सिडकोने भूखंड वाटपाबाबतचे नियम तयार करुन ते मान्यतेसाठी शासनाकडे सादर करावेत, असे समितीने निदेश दिले.

**अभिप्राय व शिफारशी :**

**(१)** समितीसमवेत सिडकोच्या अधिका-यांशी दिनांक २८ एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या चर्चेच्या वेळी समितीला पुरविण्यात आलेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीच्या असे निदर्शनास आले की, सिडको या राज्य शासनाच्या स्वायत्त मंडळात सन १९९७ पासून मागासवर्गिय अधिकारी व कर्मचाऱ्यांची सरळसेवेने व पदोन्नत्तीन भरावयाची तांत्रिक व अतांत्रिक संवर्गातील १७४ पदे रिक्त असून एकूण रिक्त ३६० पदांपैकी मागासवर्गीयांची १७४ म्हणजेच ५० टक्यांपेक्षा अधिक पदे रिक्त असल्याने मागासवर्गीय उमेदवारांवर अन्याय झाला असून त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे असा अभिप्राय समितीने व्यक्त केला. **सिडकोमधील मागासवर्गीयांची सदर सर्व रिक्त पदे लवकरात लवकर भरून केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(२) नवी मुंबई येथील मानस सरोवर या गृह संकुल इमारतीतील रहिवाशांना निवासी दराने पाणीपुरवठा करून सदर रहिवाशांना वाणिज्यीक दराने देयके न देता ती निवासी दरानेच देण्याबाबत तसेच इमारत क्रमांक १४ व १५ मधील रहिवाशांना भोगवटा प्रमाणपत्रे**

**लवकरात लवकर वितरित करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत सादर करावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

**(३)** सिडकोतर्फे बांधण्यात आलेल्या निरनिराळया गृहनिर्माण वसाहतींमध्ये अनुसूचित जातीसाठी आरक्षण असणे आवश्यक आहे असा समितीने अभिप्राय व्यक्त केला. **सिडकोने अनुसूचित जातीसाठी भूखंड आरक्षित करण्याबाबतची मान्यता शासनाकडून घ्यावी व तशा प्रकारचा प्रस्ताव शासनास सादर करावा तसेच गृहनिर्माण विभागाप्रमाणे ही बाब सिडकोने आपल्या नियमांमध्ये अंतर्भूत करावी व भूखंड वाटपाबाबत नविन नियम तयार करून ते शासनाकडे पाठवावेत व त्याबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांत सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

**(४)** सिडकोमध्ये मागासवर्गीय उमेदवारांसाठी आरक्षित असलेली सहाय्यक परिवहन अभियंता व उप नियोजनकार ही वर्ग-१ ची तांत्रिक पदे आवश्यक शैक्षणिक पात्रता धारक उमेदवार न मिळाव्याने रिक्त असल्याची बाब योग्य नसल्याचा अभिप्राय समितीने व्यक्त केला. **सदर पदे भरण्यासाठी ट्रान्सपोर्ट इंजिनियरिंग आणि टाऊन अँड प्लॅनिंग हे शिक्षण देणारी महाविद्यालये ज्या ठिकाणी असतील त्या ठिकाणी सिडकोने शेवटच्या वर्षाला शिक्षण घेणा-या उमेदवारांशी संपर्क साधून विद्यालये क्षेत्रीय मुलाखत घेऊन (Campus Interview) तसेच सदर पदाची जाहिरात राज्यातील जास्तीत जास्त खपाच्या मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांमधून प्रसिद्ध करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या कालावधीत सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

## पोलीस आयुक्त कार्यालय, नवी मुंबई

समितीने पोलीस आयुक्त कार्यालयातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेल्या वर्ग अ ते ड मधील तांत्रिक व अतांत्रिक पदे सरळसेवा भरतीद्वारे भरण्यासाठी अवलंबिण्यात येत असलेल्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती देण्यात यावी असे सांगितले असता पोलीस उपायुक्त यांनी असे विदित केले की, वर्ग १ व २ मधील पी.एस.आय.च्या वरच्या स्तरावरील पदे पोलीस महासंचालक स्तरावरून भरली जातात. खालच्या पदांमध्ये सहाय्यक फौजदार व पोलीस हवालदार या संवर्गामध्ये १ व २ पदांचा अनुशेष आहे.

समितीने सहाय्यक फौजदार या संवर्गात अनुशेष शिल्लक राहण्याचे व पोलीस हवालदार संवर्गात २ पदांचा अनुशेष शिल्लक राहण्याचे कारण काय आहे अशी विचारणा केली असता नवी मुंबई महापालिकेकरिता ही पदे वाढली आहेत. उपायुक्तांनी अशी माहिती दिली. समितीने इतर अनुशेष भरला जात असताना अनुसूचित जातीचा अनुशेष का शिल्लक राहिला व अशी १०० पदे भरली असतील तर त्यापैकी १३ पदे अनुसूचित जातीच्या उमेदवारांमधून भरली पाहिजेत असा शासनाचा दंडक आहे असे नमूद केले असता, उपायुक्त यांनी सांगीतले की, महापालिकेच्या अतिक्रमण विभागासाठी नवीन पदे निर्माण झाली आहेत. ती पदे येणाऱ्या भरतीमध्ये भरण्यात येतील तेव्हा हा अनुशेष देखील दूर होईल उपायुक्त यांनी पदोन्नतीने पदे भरावयाची आहेत. १९७८ पदे नव्याने निर्माण झाली आहेत. भरलेल्या पदांच्या अनुषंगाने अनुशेष भरला जातो. २ पदे रिक्त आहेत. एकूण १०७९ मंजूर पदे आहेत. त्यापैकी १०६२ पदे भरली असून १७ पदे रिक्त आहेत अशी माहिती दिली. त्यावर समितीने १४० पदे अनुसूचित जातीची भरली पाहिजेत. तुम्ही फक्त १३८ पदे भरली आहेत. समितीने २ पदे न भरण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता भरती झालेली नाही, नवीन पदे निर्माण झाली होती. आता पोलीस कॉन्स्टेबल पदाची जी भरती करणार आहोत त्यामुळे जुन्या लोकांना पदोन्नती मिळते. पदोन्नतीची पदे असतील तर भरतीचा विषय येत नाही. सरळ सेवेने पद भरावयाचे असेल तर साखळी पद्धतीने प्रक्रिया सुरू राहते. पदोन्नतीने आणि सरळसेवेने भरती केली जाते. ही सरळसेवेची पदे आहेत. पीएसआय ते कॉन्स्टेबलपर्यंतची पदे एकत्रित करून भरती करतो. भरती केल्यानंतर पुढे प्रमोशन देण्यात येते. किती भरती केली, किती लोकांना प्रमोशन दिले, नवीन भरती किती लोकांची करणार आहोत याबाबत मी पुन्हा एकदा आढावा घेतो असे उपायुक्तांनी समितीस आश्वासित केले. समितीने १३ टक्के एस.सी.साठी पदे राखीव ठेवून तो अनुशेष भरला पाहिजे, याबाबत खुलासा करण्यास सांगितले असता उप आयुक्त यांनी विदित केले की, महापालिकेच्या अतिक्रमण विभागासाठी पदे निर्माण झाली आहेत. आमच्याकडे

१०७९ पदे मंजूर असून त्यापैकी १०६२ पदे भरली आहेत. त्यामध्ये अनुसूचित जातीची १४० पदे येतात, त्यापैकी १३८ पदे भरली असून २ पदांचा अनुशेष शिल्लक आहे, अशी माहिती दिली.

समितीने दर तीन वर्षांनी रोस्टर तपासणी करणे आवश्यक आहे असे सांगीतले असता उप आयुक्तांनी रोस्टर तपासणीसाठी आम्ही मागासवर्ग कक्षाला कळविले आहे. ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्ह्याची निर्मिती झालेली आहे. त्यामुळे आम्हाला चंद्रपूर पॅटर्नप्रमाणे कर्मचारी भरती करावी असे सांगण्यात आलेले आहे. ठाणे जिल्ह्याच्या विभाजनानंतर नवनिर्मित ठाणे व पालघर असे दोन जिल्हे करण्यात आलेले आहेत. ठाणे जिल्ह्याचे विभाजन होण्याच्या आधी ठाणे जिल्ह्यामध्ये अनुसूचित जातीसाठी ८ टक्के, अनुसूचित जमातीसाठी २२ टक्के व इतर मागास वर्गासाठी ९ टक्के आरक्षण होते. पण आता नवनिर्मित ठाणे जिल्ह्यासाठी अनुसूचित जातीसाठी १३ टक्के, अनुसूचित जमातीसाठी ७ टक्के व इतर मागास वर्गासाठी ९ टक्के आरक्षण सरळसेवा भरतीकरिता लागू करण्यात आले आहे. पूर्वीच्या ठाणे जिल्ह्यामधून पालघर, वसई, डहाणू, तलासरी, जव्हार, वाडा, मोखाडा या तालुक्यांचे विभाजन होऊन या ८ तालुक्यांचा समावेश असलेल्या नवनिर्मित आदिवासी बहुल पालघर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली आहे. नवी मुंबईतील काही भाग हा ठाणे व रायगड या जिल्ह्यांना लागून आहे. त्यामुळे येथे बिंदू नामावलीसाठी चंद्रपूर पॅटर्न वापरावा किंवा कसे यासंबंधी शासनाचे मत मागविले आहे. यासंबंधी आम्ही एकूण लोकसंख्येचा आढावा घेतो आणि आपणास कळवितो असे शासनातर्फे कळविण्यात आले आहे, असे सांगितले.

समितीने सहायक फौजदार १, पोलीस हवालदार २, पोलीस नाईक १, पोलीस शिपाई १७, कनिष्ठ लिपिक २ असा एकूण २३ पदांचा अनुशेष आहे, ही पदे केव्हा भरण्यात येणार आहेत? याची विचारणा केली असता उपआयुक्तांनी सहायक फौजदार यात एका पदाचा अनुशेष दिसत आहे. सदर पद हे नव्याने निर्माण करण्यात आलेले आहे. भरती प्रक्रिया पूर्ण होताच हे पद भरण्यात येईल. कनिष्ठ लिपिक संवर्गातील पदे भरण्यासाठी शासनाचा बॅन आहे. शासनाचा बॅन असल्यामुळे कनिष्ठ लिपिक संवर्गातील १९ विविध प्रवर्गातील पदे भरण्यात आलेली नाहीत. त्यासाठी शासन स्तरावर पत्रव्यवहार सुरू आहे, असे सांगितले.

समितीने भरती प्रक्रिया कधी पूर्ण करणार आहात? यासंबंधातील अहवाल आपण कधी द्याल? अशी विचारणा केली असता उपआयुक्त यांनी मे अखेर पर्यंत भरती प्रक्रिया पूर्ण करणार आहोत. भरती पूर्ण झाल्यानंतर जुलै अखेर पर्यंत अहवाल देतो असे समितीस आश्वासित केले.

समितीने सन २०१५ मध्ये ॲट्रॉसिटीचे किती गुन्हे दाखल झाले आहेत? ज्या अनुसूचित जातीच्या लोकांवर अन्याय करण्यात आला आहे त्यांना शासनाकडून मदत करण्यात आली आहे काय तसेच आपला कन्व्हीक्शन रेट काय आहे अशी विचारणा केली असता, उप आयुक्त यांनी सन २०१५ मध्ये १३ गुन्हे दाखल झाले असून १२ प्रकरणांची निर्गती झाली व केवळ १ प्रकरण प्रलंबित आहे. तसेच सन २०१४ व २०१५ चे प्रत्येकी एक प्रकरण प्रलंबित आहे. सदर दोन्ही प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. सन २०१६ मध्ये ७ गुन्हे दाखल झाले असून ४ गुन्ह्यांची निर्गती झाली व सद्य:स्थितीत ३ प्रकरणे प्रलंबित आहेत. येथील कन्व्हीक्शन रेट ५६ टक्के आहे. जे फिर्यादी असतात त्यांना सामाजिक न्याय विभागाकडून मदत केली जाते. एफ.आय.आर.दाखल झाल्यानंतर तो सामाजिक न्याय विभागाकडे पाठविला जातो. त्यांच्या मार्फत चौकशी केली जाते आणि मग मदत केली जाते. सामाजिक न्याय विभागाकडून किती जणांना मदत करण्यात आली आहे त्यासंबंधातील आकडेवारी त्या विभागाकडून आमच्याकडे अजून आलेली नाही. लेखी माहिती सामाजिक विभागाकडून प्राप्त करून घेऊन समितीला कळविण्यात येईल असे समितीला आश्वासित केले.

सन २०१२ ते २०१५ या कालावधीत ज्या मागासवर्गीयांवर अन्याय झाला आहे त्या पैकी किती जणांना सामाजिक न्याय विभागाकडून मदत देण्यात आली आहे यासंबंधातील माहिती समितीला नंतर लेखी स्वरूपात पाठवून द्यावी व आजच्या बैठकीला सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांना देखील बोलाविले पाहिजे होते, असे समितीने मत व्यक्त केले.

**विभागीय सचिवांची साक्ष**

समितीने सामाजिक न्याय विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला ज्या मागासवर्गीयांवर अन्याय करण्यात आला त्यांना देण्यात आलेल्या अर्थसहाय्याबाबत माहिती द्यावी असे निदेशित करून डिस्ट्रीक्ट लेव्हलवर ज्या केसेस पाठविल्या जातात त्या केसेसबाबत पोलीस विभागाने सामाजिक न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याबाबत डिस्ट्रीक लेव्हलवर निर्णय घेतला जातो काय ? असल्यास, मग अद्याप डिस्ट्रीक्ट लेव्हलवर निर्णय का झाला नाही ? आपण डिस्ट्रीक्ट लेव्हलच्या अधिकाऱ्यांकडे याबाबत विचारणा करावी. त्यांनी प्रस्ताव दिल्यानंतर ४२ लोकांना अर्थसहाय्य मिळावयास पाहिजे होते. डिस्ट्रीक्ट लेव्हलवर हलगर्जीपणा झालेला आहे काय ? अर्थसहाय्य का दिले नाही या संदर्भात प्रत्येक केसची तपासणी करावी लागेल. समितीने पोलीस विभागाने जे पात्र आहेत अशा ४२ केसेस सामाजिक न्याय विभागाकडे पाठविलेल्या आहेत. डिस्ट्रीक्ट लेव्हलवर निर्णय होत असला तरी सामाजिक न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांनी

विलंब का केलेला आहे ? आपण इतर लोकांना अर्थसहाय्य दिले. मग ४२ लोकांना का वंचित ठेवले ? सीपी कार्यालयाकडून सामाजिक न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे काय, अशी विचारणा केली असता, विभागीय सचिवांनी या संदर्भात सन १९९५ चे नियम होते. सन २०१६ मध्ये नवीन नियम तयार झालेले आहेत. आता आपण सन २०१३ प्रमाणे देतो. गव्हर्नमेंट ऑफ इंडियाने एप्रिल, २०१६ पासून नवीन नियम नोटिफाय केलेले आहेत. आपण ते नियम लागू करण्यासाठी जीआर काढतो. आपण ती प्रोसेस करीत आहोत. त्यामध्ये अशी तरतूद आहे की, आपण चार्जशिट झाल्यावर मदत देतो. १० गुन्हे चार्जशिट झालेले नाहीत. ते गुन्हे तपासानंतर फायनल करण्यात आलेले आहेत. " बी " फायनल ८ गुन्हे, " सी " फायनल २ गुन्हे आणि एन.सी. फायनल १ गुन्हा आहे. म्हणजे ४२ गुन्ह्यांपैकी ११ गुन्हे वगळून उर्वरित केसमध्ये मदत मिळणे गरजेचे आहे, अशी माहिती दिली.

आता केंद्र शासनाचा कोणता नियम लागू झालेला आहे ? दिनांक १ जानेवारी २०१६ पासून ॲट्रॉसिटी ॲक्टमध्ये बरेच बदल झालेले आहेत. गुन्हा म्हणून त्यामध्ये बऱ्याच गोष्टी इन्क्ल्युड करण्यात आलेल्या आहेत. कोणी मिडडे मिलमध्ये वेगळी रांग लावत असेल किंवा इतरांना नोकरी दिली जाते, परंतु त्यांना नोकरी दिली जात नाही, त्यांच्याशी बरोबर व्यवहार करीत नाहीत अशा १०-१५ गोष्टी त्यामध्ये इन्क्ल्युड झालेल्या आहेत. नियमात असे बदल झालेले आहेत की, कॉम्पेन्सेशनची जी रक्कम आहे ती वाढवून दोन पट करण्यात आलेली आहे. तसेच, कॉम्पेन्सेशन देण्याची जी पद्धत आहे ती देखील सिम्प्लीफाय करण्यात आलेली आहे. पूर्वी चार्जशिटवर कॉम्पेन्सेशन मिळत होते. आता बऱ्याच गोष्टींमध्ये केस रजिस्टर झाल्यानंतर ५० टक्के, चार्जशिट दाखल झाल्यानंतर २५ टक्के आणि कन्व्हेक्शन नंतर २५ टक्के कॉम्पेन्सेशन मिळते. वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे असतात. खूनाच्या गुन्ह्यात वर्किंग असेल तर ७ लाख रुपये आणि वर्किंग नसेल तर ३.५ लाख रुपये देण्याची तरतूद आहे. बलात्काराच्या गुन्ह्यात ७ लाख रुपये देण्याची तरतूद आहे. म्हणजे वर्किंग असेल तर ७ लाख रुपये आणि वर्किंग नसेल तर ३.५ लाख रुपये देण्याची तरतूद आहे. अफेक्टेड मर्डर केसमध्ये त्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरी देण्याची तरतूद आहे. तसेच, स्पेशल कोर्टाची आणि स्पेशल पब्लिक प्रोसिक्युटर नेमण्याची तरतूद आहे. यामध्ये सन २०१२ पासूनच्या काही केसेस आहेत. ॲट्रॉसिटी ॲक्ट खाली सन २०१२ ते २०१५ दरम्यान केसेस दाखल झालेल्या आहेत. एखादी घटना घडल्यानंतर पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल केला जातो. आपण एफआयआर दाखल झाल्यानंतर ताबडतोब जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांकडे रिपोर्ट पाठवितो. ४२ केसेस पैकी काही रिपोर्ट रायगड जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांकडे आणि काही रिपोर्ट ठाणे समाज कल्याण अधिकाऱ्यांकडे

सादर केलेले आहेत. कारण, यामध्ये ठाणे आणि रायगड जिल्ह्याचे ज्युरिस्डीक्शन येते. तसेच, मघाशी सांगण्यात आले की, ११ केसेस फायनल झालेल्या आहेत. म्हणजे चार्जशिट गेलेले नाही. ज्या केसेसमध्ये चार्जशिट गेलेले आहे त्याबाबत मी पुन्हा एकदा आमचा रिपोर्ट देतो. जेणेकरून त्यांना ५० टक्के, २५ टक्के या हिशोबाने ते पूर्ण करता येईल आणि ज्या केसेस फायनल झालेल्या आहेत त्याबाबतही रिपोर्ट पाठवितो. काही केसेस " ब " फायनल म्हणजे मॅलिशियसली फॉल्स कम्प्लेंट तर काही केसेस " क " फायनल झालेल्या आहेत आणि काही एन.सी. फायनल झालेल्या आहेत. आम्ही तसा रिपोर्ट पाठवितो. म्हणजे त्यांना पेमेंट रिलिज करणे सोईचे होईल. समाज कल्याण अधिकारी, अलिबाग, रायगड यांच्याकडे दिनांक १९ मार्च २०१२, ९ डिसेंबर २०१३, ३ जानेवारी २०१४, ११ जानेवारी २०१४, २४ जानेवारी २०१४, २५ मार्च २०१४, ४ एप्रिल २०१४, २२ मे २०१४, ११ जुलै २०१४, १९ जुलै २०१४, १३ ऑगस्ट २०१४ अशा वेगवेगळ्या तारखांना रिपोर्ट सादर केलेला आहे. शेवटचा रिपोर्ट ५ डिसेंबर २०१५ रोजी सादर केलेला आहे, अशी विभागीय सचिवांनी माहिती दिली.

समितीने नेरुळमध्ये कुमार स्वप्नील सोनावणे या तरुणाला मारहाण करून त्याचा खून करण्यात आलेला आहे. नेरुळ पोलीस स्टेशनमधील दोन पोलीस अधिकाऱ्यांनी दक्षता घेतली असती आणि आरोपींना साथ दिली नसती तर १६ वर्षे वय असलेला कुमार स्वप्नील सोनावणे या तरुणाचा जीव वाचला असता. तसे बघितले तर त्याच्या हत्येला श्री.राजगुरु आणि श्री.माने हे पोलीस अधिकारी जबाबदार आहेत. कारण, त्यांनी काळजी घेतली असती तर त्या तरुणाचा जीव वाचला असता. परंतु, त्यांनी काहीच केले नाही. या प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे? अशी विचारणा केली असता आयुक्तांनी असे सांगितले की, यावर मी स्वतः हे प्रकरण हाताळलेले आहे. मी या प्रकरणामध्ये अत्यंत बारकाईने विचारपूस केलेली आहे व चौकशी केलेली आहे. आपण म्हणता त्याप्रमाणे यामध्ये तशी वस्तुस्थिती नाही. पीएसआय श्री.राजगुरु आणि श्री.माने यांचा निष्काळजीपणा नक्कीच आहे. परंतु, यामध्ये त्यांची क्रिमिनल इन्वॉल्वमेंट नाही. स्वप्नील सोनावणे यांना जेव्हा मारहाण झाली त्या घटनेमध्ये दोन्ही पीएसआयपैकी कोणाचाही हात नव्हता. त्यांच्या विरुद्ध प्रशासकीय चौकशी सुरू असून तो अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यांना प्रशासकीय शिक्षा होईल. त्यामध्ये कोणतीही फेव्हरेटिझम, रिलॅक्सेशन होणार नाही. तक्रार दाखल झाल्याच्या तारखेपासून मी गुन्हे शाखेमध्ये गेलो. मी स्वतः इन्व्हेस्टीगेस्टश सुपरव्हाईजरींग करत आलो आहे. या गुन्ह्यामध्ये सर्व आरोपींवर चार्जशिटस् दाखल केलेले आहेत. या प्रकरणी आजच स्पेशल पीपी नेमण्यासंदर्भात बैठक होणार असून त्यानंतर स्पेशल पीपीची नेमणूक करण्यात येईल. तो मोबाईल

ट्रेस झालेला आहे. त्या मुलाला पोलीस स्टेशनमध्ये मारहाण झालेली नसून याबद्दल काहीही पुरावे नाहीत. स्वप्नील आणि त्याची आई हे पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करायला गेले तेव्हा मुलीच्या आई वडिलांना बोलावून घेतले तेव्हा या दोन्हींची प्रत्यक्ष चर्चा झाली. मारहाण झालेली घटना दुसऱ्या दिवशीची आहे.

**अभिप्राय व शिफारशी :**

(१) समितीने नेरुळमध्ये कुमार स्वप्नील सोनावणे या तरुणाला मारहाण करून त्याच्या करण्यात आलेल्या खूनाच्या प्रकरणी नेरुळ पोलीस स्टेशनमधील दोन पोलीस अधिकाऱ्यांनी दक्षता घेतली असती आणि निष्काळजीपणा दाखविला नसता तर १६ वर्षे वय असलेला कुमार स्वप्नील सोनावणे या तरुणाचा जीव वाचला असता असा अभिप्राय व्यक्त केला. **सदर प्रकरणी शासनाच्या संबंधित विभागाने तातडीने पीडित कुटूंबाला मदत करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या कालावधीत सादर करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

(२) समितीने नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयाद्वारे दर तीन वर्षांनी बिंदू नामावलीची (रोस्टर) तपासणी करून घेणे आवश्यक असल्याचा अभिप्राय व्यक्त केला. **नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयाने बिंदू नामावलीच्या संदर्भात चंद्रपूर पॅटर्न प्रमाणे भरती करावी किंवा कसे या शासनास विचारलेल्या अभिप्रायासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय घेऊन नवी मुंबई पोलीस आयुक्त कार्यालयास त्याबाबत अवगत करावे व करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या कालावधीत कळविण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.**

# परिशिष्ट - एक

## नवी मुंबई महानगरपालिका व सिडको यांचेकडून समितीला प्राप्त झालेली माहिती

## "परिशिष्ठ अ"

पा१

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९
महानगरपालिकांमधील कर्मचारी/अधिकारी यांचे
मॉडेल सेवा प्रवेश नियम....

नवी मुंबई महानगरपालिका
आवक क्रमांक ९४०
दिनांक २५ जुलाई 2008

महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक क्र.ठामपा २००२/८२१/प्र.क्र.८६/नवि-२३
दिनांक :- २ जुलै, २००८.

**प्रस्तावना :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ४५७(३) नुसार ज्या जागांवर नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये विहित असेल त्या जागांसाठी आवश्यक असलेली अर्हता आणि त्या जागांवर नेमणूक करण्याची पध्दती याबाबत नियम करणे आवश्यक आहे.

विविध महानगरपालिकांनी अद्यापि सेवा प्रवेश नियम तयार केलेले नाहीत. काही महानगरपालिकांमध्ये सेवा प्रवेश नियम अंशतः मंजूर आहेत. महानगरपालिकांमधील कर्मचारी/अधिकारी यांच्या सेवा प्रवेश नियमासंदर्भात न्यायालयीन दाव्यात मा.न्यायालयाकडून वारंवार याबाबत विचारणा होते. विधानमंडळ समित्यांनी देखिल सेवा प्रवेश नियम लवकरात लवकर करण्याचे दृष्टीने अनेकवेळा शिफारस केली आहे.

या पार्श्वभूमीवर महानगरपालिकांच्या कर्मचारी/अधिकारी यांचे नमूना सेवा प्रवेश नियम तयार करण्याची तसेच सेवा प्रवेश नियम तयार करण्यासंदर्भात कालबध्द कार्यक्रम आखण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महानगरपालिकेतील कर्मचारी/अधिकारी मॉडेल सेवा प्रवेश नियम शासनाने तयार केले असून त्याची प्रत सोबत पाठविण्यात येत आहे. त्या आधारे प्रत्येक महानगरपालिकेने त्यांचे सेवा प्रवेश नियम तयार करण्याच्या दृष्टीने उक्त अधिनियमाच्या कलम ४५६(१) अन्वये असे फर्मावण्यात येत आहे की, महानगरपालिकांमधील कर्मचारी/अधिकारी यांचे सेवा प्रवेश नियम तयार करण्यासंबंधात खाली दर्शविल्याप्रमाणे या आदेशाच्या दिनांकापासून कालबध्द कार्यवाही करावी :-

| | | |
|---|---|---|
| १ | सेवा प्रवेश सेवा नियम (प्रारुप) तयार करणे | १ महिना |
| २ | सेवा प्रवेश नियमासंदर्भात ठराव पारीत करणे | २ आठवडे |

| | | |
|---|---|---|
| ३ | प्रारुप सेवा प्रवेश नियम राजपत्रात प्रसिध्द करणे | १ आठवडा |
| ४ | हरकती/सूचना यासाठी देण्याचा कालावधी | १ महिने |
| ५ | प्राप्त हरकती/सूचना मागवून त्यांचे निराकरण करुन शासन मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविणे | २ आठवडे |

२. वरील सूचनांचे काटकोरपणे पालन करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( मनु कुमार श्रीवास्तव )
सचिव (नगर विकास)

प्रत :-

१) मा.महापौर, सर्व महानगरपालिका ( बृहन्मुंबई व नागपूर वगळून)
२) मा. आयुक्त, सर्व महानगरपालिका ( बृहन्मुंबई व नागपूर वगळून)
३) प्रधान सचिव, मा.मुख्यमंत्री सचिवालय
४) सर्व उप सचिव, नगर विकास विभाग त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी वर वि केलेल्या कालावधीनुसार प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांवर तातडीने कार्यवाही करावी व त शासनाच्या निदर्शनास आणावे.
५) कार्यासन नवि-२१/नवि-२२/नवि-२४/नवि-२५/नवि-२६/नवि-२८
६) निवड नस्ती (नवि-२३)

## " परिशिष्ट ब "

### महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

### अनुसूचित जाती कल्याण समिती

### नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग (प्राथमिक/माध्यमिक)

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>प्रश्न</th><th>उत्तर</th></tr>
<tr><td>१</td><td>महानगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर महापालिकेतील विविध पदांवर उमेदवारांच्या नियुक्त्या करण्यासाठी महापालिकेने सेवा प्रवेश नियम तयार केले आहेत काय? असल्यास सेवा प्रवेश नियमांची प्रत सादर करावी.</td><td>प्राथमिक विभाग<br>नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या प्राथमिक शिक्षक संवर्गाची पदे शालेय शिक्षण विभागामार्फत स्पर्धा परीक्षा (CET) घेवून भरली जातात. परिशिष्ठ-अ नुसार.<br>माध्यमिक विभाग<br>शासनाच्या सरळ सेवाभरती प्रक्रीयेच्या नियमानुसार. तसेच माध्य.शाळा संहिता व खाजगी शाळातील कर्मचा-याकरीता सेवा शर्ती नियम १९८१ यामध्ये दिलेले मार्गदर्शन तत्वाचा अवलंब केला जातो.</td></tr>
<tr><td>२</td><td>अ) महानगरपालिकेतील वर्ग अ ते ड मधील तांत्रिक व अतांत्रीक अधिकारी व कर्मचारी यांच्या पदांची मंजूर संख्या किती आहे. त्यापैकी सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४ ते ऑक्टोंबर २०१५ पर्यंत वर्षनिहाय एकूण किती पदे भरण्यात आली आहेत.<br><br>ब) उक्त मंजुर पदांपैकी वर्ग अ ते ड मधील किती व कोणकोणती पदे अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली आहेत?</td><td>प्राथमिक विभाग<br>अ) मंजुर पदे :
<table>
<tr><th rowspan="2">वर्ग</th><th colspan="6">मंजुर पदे (मुख्याध्यापक संवर्ग)</th></tr>
<tr><th>तांत्रिक</th><th>कार्यरत</th><th>रिक्त</th><th>अतांत्रीक</th><th>कार्यरत</th><th>रिक्त</th></tr>
<tr><td>अ</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td></td></tr>
<tr><td>ब</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td></td></tr>
<tr><td>क</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>५८</td><td>४४</td><td>१४</td></tr>
<tr><td>ड</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>५८</td><td>४४</td><td>१४</td></tr>
</table>
<table>
<tr><th rowspan="2">वर्ग</th><th colspan="6">मंजुर पदे (शिक्षक संवर्ग)</th></tr>
<tr><th>तांत्रिक</th><th>कार्यरत</th><th>रिक्त</th><th>अतांत्रीक</th><th>कार्यरत</th><th>रिक्त</th></tr>
<tr><td>अ</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>.</td></tr>
<tr><td>ब</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td></td></tr>
<tr><td>क</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>६५७</td><td>५१८</td><td>१३९</td></tr>
<tr><td>ड</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>६५७</td><td>५१८</td><td>१३९</td></tr>
</table>
सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४ ते ऑक्टोंबर २०१५ पर्यंत पदे भरण्यात आलेली नाहीत.<br><br>ब) अनुसूचित जातीची राखीव पदे खालीलप्रमाणे आहेत.
<table>
<tr><th rowspan="2">संवर्ग</th><th colspan="3">क संवर्गातील राखीव पदे (अतांत्रीक)</th></tr>
<tr><th>मंजुर</th><th>कार्यरत</th><th>रिक्त</th></tr>
<tr><td>मुख्याध्यापक</td><td>७</td><td>७</td><td>०</td></tr>
<tr><td>शिक्षक</td><td>५२</td><td>४७</td><td>५</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>५९</td><td>५४</td><td>५</td></tr>
</table></td></tr>
</table>

**माध्यमिक विभाग**

सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४ ते ऑक्टोंबर २०१५ पर्यंत पदे भरण्यात आलेली नाहीत.

| वर्ग | मा.महासभेने मंजुर केलेली पदे. (मुख्याध्यापक संवर्ग) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मुख्याध्यापक | तांत्रिक | कार्यरत | अतांत्रीक | कार्यरत | रिक्त |
| अ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ब | ० | ० | ० | १७ | ०२ | १५ |
| क | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ड | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | ० | ० | ० | १७ | ०२ | १५ |

| वर्ग | मा.महासभेने मंजुर केलेली पदे. (शिक्षक संवर्ग) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शिक्षक | तांत्रिक | कार्यरत | अतांत्रीक | कार्यरत | रिक्त |
| अ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ब | ० | ० | ० | ० | ० | ० |
| क | ० | ० | ० | २२७ | ८१ | १४६ |
| ड | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकूण | ० | ० | ० | २२७ | ८१ | १४६ |

ब) **अनुसूचित जातीची मुख्याध्यापक व शिक्षक संवर्गाची राखीव पदे खालीलप्रमाणे आहेत.**

| संवर्ग | अंतांत्रिक | | | |
|---|---|---|---|---|
| | एकूण पदे | आरक्षित पदे | भरालेली पदे | रिक्त |
| मुख्याध्यापक | १७ | ०१ | ०१ | ० |
| शिक्षक | २२७ | १८ | १४ | ०४ |

३ अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या वर्ग अ ते ड मधील पदांपैकी सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४ ते ऑक्टोंबर २०१५ पर्यंत वर्षनिहाय एकूण किती पदे भरण्यात आली आहेत व किती व कोणकोणती अनुशेषांची पदे अद्याप रिक्त आहेत? तसेच सदर अनुशेषाची पदे रिक्त राहाण्याची कारणे काय आहेत?

**प्राथमिक विभाग**

शालेय शिक्षण विभागाने सन. २०११ पासून स्पर्धा परीक्षा (CET) घेतलेल्या नाहीत. त्यामुळे गत तीन वर्षात सन (२०१२ ते २०१५) मध्ये भरती करण्यात आलेली नाही.

रिक्त अनुशेषांच्या पदांचा तक्ता सोबत जोडला आहे. परिशिष्ठ- ब ते ब-२ नुसार

शालेय शिक्षण विभागाने सन २०११ पासून स्पर्धा परीक्षा (CET) घेतलेल्या नसल्यामुळे पदे रिक्त आहेत.

**माध्यमिक विभाग**

१.सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ या कालावधीत भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही.

२.रिक्त अनुशेष मुद्दा क्र.०२ (ब) या तक्त्याचे अवलोकन व्हावे.

| | | |
|---|---|---|
| | अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेली वर्ग अ ते ड मधील पदे भरतीसाठी कोणती कार्यपध्दती अवलंबिण्यात येते याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी. | **प्राथमिक विभाग**<br>नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाच्या प्राथमिक शिक्षक संवर्गाची पदे शालेय शिक्षण विभागामार्फत स्पर्धा परीक्षा (CET) घेवून भरली जातात व मुख्याध्यापक पदांवर सेवाज्येष्ठते नुसार पदोन्नती दिली जाते.<br>**माध्यमिक विभाग**<br>शासनाच्या सरळ सेवाभरती प्रक्रीयेच्या नियमानुसार व त्यासंदर्भात वेळोवेळी शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार तसेच माध्य.शाळा संहित व खाजगी शाळातील कर्मचा-याकरीता सेवा शर्ती नियम १९८१ यामध्ये दिलेले मार्गदर्शन तत्वाचा अवलंब केला जातो.<br>१.सदर शिक्षकांची पदे भरताना वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात येते.<br>२.उमेदवाराकडून अर्ज मागवुन लेखी परिक्षा, पाठ व मुलाखत घेण्यात येते. त्या प्रक्रियेद्वारे शिक्षकांची निवड केली जाते.<br>३.सदर भरती प्रक्रिया राबविताना मा.आयुक्त, नमुंमपा यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हयाच्या महिला व बालकल्याण अधिकारी, समाज कल्याण विभागाचे अधिकारी आणि अधिवासी विकास प्रकल्प यांचेकडील अधिकारी व नमुंमपा मधील उप आयुक्त दर्जाचे अधिका-यांची समिती गठित केली जाते या समितीच्या देखरेखी खाली व मान्यतेने संपूर्ण भरती प्रक्रिया पूर्ण केली जाते. |
| ५ | अ) अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरण्यासाठी गेल्या तीन वर्षात सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४ ते ऑक्टोबर २०१५ पर्यंत वर्षनिहाय किती वेळा व कोणकोणत्या तारखांना वर्तमानपत्रात कोणकोणती पदे भरण्यासाठी जाहिराती देण्यात आल्या होत्या? (जाहिरातीच्या कात्रणाच्या झेरॉक्स प्रती तपासणीचे वेळी समितीला उपलब्ध करून द्याव्यात.)<br>ब) उक्त जाहीरातीनुसार वर्षनिहाय अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेली कोणकोणती पदे भरण्यात आली आहेत? | **प्राथमिक विभाग**<br>अ) शालेय शिक्षण विभागाने सन २०११ पासून स्पर्धा परीक्षा (CET) घेतलेल्या नाहीत. त्यामुळे रिक्त पदे भरली गेली नाहीत.<br>ब) निरंक<br>**माध्यमिक विभाग**<br>अ) निरंक<br>ब) निरंक |
| ६ | अनुसूचित जातीतील अधिकारी व कर्मचारी यांना सेवेत पदोन्नती देण्यासंदर्भात निवड समिती स्थापन करण्यात आली आहे काय? असल्यास या निवड समितीमध्ये अनुसूचित जातीतील अधिका-यांचा समावेश करण्यात आला आहे काय? नसल्यास त्याची कारणे काय आहेत? | पदोन्नती देतांना त्या त्या वेळी समिती गठित करण्यात येते. निवड समितीमध्ये अनुसूचित जातीतील एका अधिका-याची प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली जाते. |

| | | |
|---|---|---|
| | अनुसूचित जातीच्या उमेदवारांना सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४ ते ऑक्टोबर २०१५ पर्यंत वर्षनिहाय वर्ग अ ते ड मधील किती अधिकारी व कर्मचारी यांना पदोन्नती देण्यात आली आहे? पदोन्नती दिल्या असल्यास कोणकोणत्या पदावर, नसल्यास त्याची कारणे काय आहेत? | **प्राथमिक विभाग**<br>सन २०१२-१३ व सन २०१४-१५ मध्ये अनुसूचित जातीच्या २ उमेदवारांना पदोन्नती देण्यात आलेली आहे. सदर पदोन्नती मुख्यांध्यापक पदावर देण्यात आलेली आहे.<br>**माध्यमिक विभाग**<br>सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४ ते ऑक्टोबर २०१५ पर्यंत पदोन्नती देण्यात आलेली नाही. |
| ८ | अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी १०० बिंदू व ५० बिंदू नामावली (रोस्टर) नोंदवही ठेवण्यात आली आहे काय? असल्यास केव्हापासून तसेच ती अद्यावत स्वरूपात आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत? | नाही, रोष्टर हे एकूण मंजुर पदावर तयार करण्यात येते. एकत्रित रोष्टर अद्यावत स्वरूपात आहे. |
| ९ | अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे भरताना मुलाखतीच्या वेळी उपस्थित राहाण्याबाबत जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांना आगाऊ कळविण्यात आले होते काय? कळविले नसल्यास त्याची काय कारणे आहेत? कळविले असल्यास सन २०१२ ते सन २०१५ या कालावधीत वर्षनिहाय कोणकोणत्या तारखांना मुलाखतीचे वेळी जिल्हा समाजकल्याण अधिकारी उपस्थित होते? | **प्राथमिक विभाग**<br>शालेय शिक्षण विभागाने सन २०११ पासून स्पर्धा परीक्षा (CET) घेतलेल्या नाहीत. त्यामुळे गत तीन वर्षात सन (२०१२- ते २०१५) मध्ये भरती झालेली नाही.<br>**माध्यमिक विभाग**<br>सन २०१२-१३ ते २०१४-१५ या कालावधीत भरती प्रक्रिया राबविण्यात आलेली नाही. |
| १० | अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदाबाबत व पदे भरल्याबाबत अहवाल संचालक, समाजकल्याण, तसेच सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय (मागासवर्ग कक्ष) व सचिव, नगरविकास विभाग यांना पाठविण्यात आला आहे काय? सन सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४ ते ऑक्टोबर २०१५ पर्यंत केव्हा केव्हा पाठविण्यात आला आहे? | **प्राथमिक विभाग**<br>शालेय शिक्षण विभागाने सन २०११ पासून स्पर्धा परीक्षा (CET) घेतलेल्या नाहीत. त्यामुळे गत तीन वर्षात सन (२०१२- ते २०१५) मध्ये भरती करण्यात आलेली नाही.<br>**माध्यमिक विभाग**<br>गत तीन वर्षात सन (२०१२- ते २०१५) मध्ये भरती करण्यात आलेली नाही. |

<table>
<tr>
<td></td>
<td>अ) विभागीय आयुक्तांच्या कार्यालयातील सहाय्यक आयुक्त (मागास वर्ग कक्ष) यांनी अनुसूचित जातीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या आरक्षणाबाबत सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४ ते ऑक्टोबर २०१५ या कालावधीत महानगरपालिकेची तपासणी केली आहे काय? असल्यास कोणत्या तारखांना केली आहे?<br><br>ब) उक्त तपासणीत सहाय्यक आयुक्तांनी कोणकोणत्या त्रुटी निदर्शनास आणून दिल्या आहेत? या त्रुटींची पुर्तता कशाप्रकारे केली आहे.</td>
<td>

**प्राथमिक विभाग**

अ) सहाय्यक आयुक्त (मागास वर्ग कक्ष), कोकण भवन, नवी मुंबई यांनी या कार्यालयातील एकुण मंजर पदांची नोंदवही/रोष्टर ३१ जुलै, २०१३ रोजी तपासलेले आहे.

ब) तपासलेल्या नोंदवही/रोष्टर मध्यें खालील बाबी नमूद करण्यात आलेल्या आहेत.

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>नोंदवही/रोष्टर मध्ये नमूद बाबी</th><th>केलेली पुर्तता</th></tr>
<tr><td>१</td><td>मागासवर्गीय आरक्षण प्राथम्याने भरण्यात यावा.</td><td>शासनाकडे स्पर्धा परीक्षा (CET) मार्फत शिक्षक मिळणेसाठी मागणी करतेवेळी मागासवर्गीय उमेदवारांची मागणी करण्यात आलेली आहे.</td></tr>
<tr><td>२</td><td>अतिरिक्त भरण्यात आलेल्या पदांबाबतचा खुलासा सादर करणे.</td><td>सदर अतिरिक्त पदे ही जून २००० साली शिक्षण मंडळ स्थापन होतेवेळी जिल्हा परिषद, ठाणे यांचेकडून हस्तांतरण होवून आलेली आहेत. नवी मुंबई महानगरपालिकेने ही अतिरिक्त पदे भरलेली नाहीत.</td></tr>
</table>

**माध्यमिक विभाग**

अ) शिक्षक या संवर्गातील रोष्टर तपासणी बाबत मा.सहा आयुक्त मागास वर्ग कक्ष यांच्याकडे तपासणी बाबत या कार्यालयाकडुन दिनांक ०४/१२/१२ रोजी पत्र देण्यात आले होते. सदर माध्यमिक शिक्षकांच्या पदाना शासनाची मंजुरी नसल्याकारणाने संबंधित विभागाकडुन सदर रोष्टर तपासण्यात आलेले नाही. मंजुरी नंतर संबंधित विभागाकडून रोष्टरची तपासणी करण्यात येईल असे सहा.आयुक्त (मावक) यांच्या कार्यालयाकडून सांगण्यात आले होते या कार्यालयाकडून पाठविण्यात आलेल्या पत्राची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

ब) उक्त तपासणी झाली नसल्यामुळे सदर माहिती निरंक समजण्यात यावी

</td>
</tr>
<tr>
<td>१२</td>
<td>अनुसूचित जातीच्या अधिकारी कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबी हाताळण्यासाठी महानगरपालिकेमध्ये विशेष मागासवर्ग कक्ष स्वतंत्ररित्या स्थापन करण्यात आला आहे काय? असल्यास कंव्हापासून? तसेच त्यासाठी किती अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून दिले आहेत? विशेष मागासवर्ग कक्ष स्थापन केला नसल्यास त्याची कारणे काय आहेत?</td>
<td>होय. सोबत जोडलेल्या परिशिष्ठानुसार.</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| १३ | सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४ ते ऑक्टोबर २०१५ या कालावधीत वर्षनिहाय अनुसूचित जातीच्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भातील निवेदने महानगरपालिकेस प्राप्त झाली आहेत काय? असल्यास किती? तसेच त्याचे स्वरूप काय आहे व सदर निवेदनाच्या संदर्भात काय कार्यवाही करण्यात आली आहे? | सन २०१२-२०१३, २०१३-२०१४, २०१४ ते [illegible] अनुसूचित जातीच्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भातील निवेदने शिक्षण विभागात प्राप्त झालेली नाहीत. |
| १४ | महानगरपालिकेत नैमित्तिक कामगार म्हणून ऑक्टोबर २०१५ अखेरपर्यंत किती कर्मचारी कार्यरत आहेत? तसेच त्यापैकी अनुसूचित जातीच्या कर्मचा-यांची संख्या किती आहे? | **प्राथमिक विभाग**<br>शालेय शिक्षण विभागाने सन २०११ पासून स्पर्धा परीक्षा (CET) घेतलेल्या नाहीत. त्यामुळे रिक्त जागांवर शिक्षक उपलब्ध झालेले नाहीत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये म्हणून नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभागाने सन २०११ पासून तात्पुरत्या स्वरूपात ठोक मानधनावर शिक्षक भरलेले आहेत. सध्यस्थितीत १२६ शिक्षक ठोक मानधनावर कार्यरत आहेत. त्यापैकी अनुसूचित जातीच्या शिक्षकांची संख्या १५ इतकी आहे.<br>**माध्यमिक विभाग**<br>विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून ३२ ठोक मानधन शिक्षक तात्पुरत्या स्वरुपात घेण्यात आले आहेत. त्यामध्ये अनुसुचित जातीच्या शिक्षकांची संख्या १४ इतकी आहे. |

उप आयुक्त (शिक्षण)
नवी मुंबई महानगरपालिका शिक्षण विभाग

# " परिशिष्ठ क "

नवी मुंबई महानगरपालिकेतील सवर्गनिहाय शासन मान्य पदावर कार्यरत अधिकारी/ कर्मचाऱ्यांची माहिती दि.३१/१२/२०१२ अखेर

तांत्रिक (सरळसेवा व पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत आरक्षित होणारी पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | १३३ | ११२ | २१ | २१ | १५ | ६ |
| २ | ब | १ | ० | १ | ० | ० | ० |
| ३ | क | ८१० | ६६५ | १४५ | ७१ | ६३ | ८ |
| ४ | ड | २७७ | २४६ | ३१ | १७ | १४ | ३ |
| **एकुण अबकड** | | **१२२१** | **१०२३** | **१९८** | **१०९** | **९२** | **१७** |

अतांत्रिक (सरळसेवा व पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत आरक्षित होणारी पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | १७ | ९ | ८ | ३ | १ | २ |
| २ | ब | २० | ११ | ९ | ४ | २ | २ |
| ३ | क | ३५६ | ३१५ | ४० | ३७ | ३३ | ४ |
| ४ | ड | १५८ | १२८ | ३० | १२ | १२ | ० |
| **एकुण अबकड** | | **५५१** | **४६३** | **८७** | **५६** | **४८** | **८** |
| **एकूण मंजुर पदे (तांत्रिक + अतांत्रिक) =** | | | १७७२ | **एकूण भरलेली पदे (तांत्रिक + अतांत्रिक) =** | | **१४८६** | |

नवी मुंबई महानगरपालिकेतील सवंगानिहाय सद्यस्थितीत कार्यरत अनुसुचित जाती वर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांची माहिती दि.३१/१२/२०१२ अखेर

तांत्रिक (सरळसेवा)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत आरक्षित होणारी पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | १०४ | ८६ | १८ | १४ | १० | ४ |
| २ | ब | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | क | ७३९ | ६०८ | १३१ | ५९ | ५३ | ६ |
| ४ | ड | २७३ | २४३ | ३० | १६ | १४ | २ |
| | **एकुण अबकड** | **१११६** | **९३७** | **१७९** | **८९** | **७७** | **१२** |

**सफाई कामगार संवर्गासाठी बिंदु नामावली नाही. (मंजुर पदे ८६ व भरलेली पदे ८३)**

अतांत्रिक (सरळसेवा)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत आरक्षित होणारी पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | ८ | २ | ६ | १ | ० | १ |
| २ | ब | ९ | ० | ९ | २ | ० | २ |
| ३ | क | १९५ | १७५ | २० | १५ | १३ | २ |
| ४ | ड | १५८ | १२८ | ३० | १२ | १२ | ० |
| | **एकुण अबकड** | **३७०** | **३०५** | **६५** | **३०** | **२५** | **५** |

नवी मुंबई महानगरपालिकेतील सद्यस्थितीत कार्यरत अनुसुचित जाती वर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांची माहिती दि.३१/१२/२०१२ अखेर

## तांत्रिक (पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत आरक्षित होणारी पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | २९ | २६ | ३ | ७ | ५ | २ |
| २ | ब | १ | ० | १ | ० | ० | ० |
| ३ | क | ७१ | ५७ | १४ | १२ | १० | २ |
| ४ | ड | ४ | ३ | १ | १ | ० | १ |
| **एकुण अबकड** | | **१०५** | **८६** | **१९** | **२०** | **१५** | **५** |

## अतांत्रिक (पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत आरक्षित होणारी पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | ९ | ७ | २ | २ | १ | १ |
| २ | ब | ११ | ११ | ० | २ | २ | ० |
| ३ | क | १६१ | १४० | २० | २२ | २० | २ |
| ४ | ड | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकुण अबकड** | | **१८१** | **१५८** | **२२** | **२६** | **२३** | **३** |

नवी मुंबई महानगरपालिकेतील संवर्गनिहाय सद्यस्थितीत कार्यरत अनुसुचित जाती वर्गातील अधिकारी/ कर्मचायाची माहिती दि.३१/१२/२०१३अखेर

तांत्रिक (सरळसेवा व पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत आरक्षित होणारी पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | १३३ | ११० | २३ | २१ | १५ | ६ |
| २ | ब | १ | ० | १ | ० | ० | ० |
| ३ | क | ८१० | ६९२ | ११८ | ७० | ६१ | ९ |
| ४ | ड | २७७ | २५३ | २४ | १७ | १६ | १ |
| एकुण अबकड | | १२२१ | १०५५ | १६६ | १०८ | ९२ | १६ |

अतांत्रिक (सरळसेवा व पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत आरक्षित होणारी पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | १९ | ११ | ८ | ३ | १ | २ |
| २ | ब | २० | १२ | ८ | ४ | ३ | १ |
| ३ | क | ३५६ | ३१९ | ३७ | ३७ | ३४ | ३ |
| ४ | ड | १५८ | १४७ | ११ | १२ | १२ | ० |
| एकुण अबकड | | ५५३ | ४८९ | ६४ | ५६ | ५० | ६ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| एकूण मंजुर पदे (तांत्रिक + अतांत्रिक) = | १७७४ | एकूण भरलेली पदे (तांत्रिक + अतांत्रिक) = | १५४४ | |

Class-I

नवी मुंबई महानगरपालिकेतील संवर्गनिहाय सद्यस्थितीत कार्यरत अनुसुचित जाती वर्गातील अधिकारी/ कर्मचायाची माहिती दि.३१/१२/२०१३अखेर

तांत्रिक (सरळसेवा )

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत आरक्षित होणारी पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | १०४ | ८४ | २० | १४ | १० | ४ |
| २ | ब | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | क | ७३९ | ६३८ | १०१ | ५८ | ५३ | ५ |
| ४ | ड | २७३ | २५० | २३ | १६ | १६ | ० |
| | एकुण अबकड | १११६ | ९७२ | १४४ | ८८ | ७९ | ९ |

सफाई कामगार संवर्गासाठी बिदु नामावली नाही. (मंजुर पदे ८६ व भरलेली पदे ८३)

अतांत्रिक (सरळसेवा )

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत आरक्षित होणारी पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | ८ | ३ | ५ | १ | ० | १ |
| २ | ब | ९ | १ | ८ | २ | १ | १ |
| ३ | क | १९५ | १८३ | १२ | १५ | १४ | १ |
| ४ | ड | १५८ | १४७ | ११ | १२ | १२ | ० |
| | एकुण अबकड | ३७० | ३३४ | ३६ | ३० | २७ | ३ |

नवी मुंबई महानगरपालिकेतील संवर्गनिहाय सद्यस्थितीत कार्यरत अनुसुचित जाती वर्गातील अधिकारी/ कर्मचायाची माहिती दि.३१/१२/२०१३अखेर

तांत्रिक (पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत आरक्षित होणारी पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | २९ | २६ | ३ | ७ | ५ | २ |
| २ | ब | १ | ० | १ | ० | ० | ० |
| ३ | क | ७१ | ५४ | १७ | १२ | ८ | ४ |
| ४ | ड | ४ | ३ | १ | १ | ० | १ |
| **एकुण अबकड** | | **१०५** | **८३** | **२२** | **२०** | **१३** | **७** |

अतांत्रिक (पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत आरक्षित होणारी पदे | अनुसुचित जाती आरक्षणाअंतर्गत कार्यरत कर्मचा-यांची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | ११ | ८ | ३ | २ | १ | १ |
| २ | ब | ११ | ११ | ० | २ | २ | ० |
| ३ | क | १६१ | १३६ | २५ | २२ | २० | २ |
| ४ | ड | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकुण अबकड** | | **१८३** | **१५५** | **२८** | **२६** | **२३** | **३** |

नवी मुंबई महानगरपालिकेतील संवर्गनिहाय सद्यास्थतीत कार्यरत इतर मागास वर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांची माहिती दि.३१/१०/२०१५ अखेर

तांत्रिक (सरळसेवा व पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचीत जाती साठी टकेवारी नुसार आरक्षित पदे | प्रत्यक्ष सेवेत असलेल्या अनुसुचीत जातीच्या कर्मचा-याची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | १३३ | ११४ | १९ | २० | १५ | ५ |
| २ | ब | १ | १ | ० | ० | ० | ० |
| ३ | क | ८१० | ६८७ | १२३ | ७२ | ६७ | ५ |
| ४ | ड | २७७ | २५७ | २० | १७ | १६ | १ |
| | **एकुण अबकड** | **१२२१** | **१०५९** | **१६२** | **१०९** | **९८** | **११** |

अतांत्रिक (सरळसेवा व पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचीत जाती साठी टकेवारी नुसार आरक्षित पदे - | प्रत्यक्ष सेवेत असलेल्या अनुसुचीत जातीच्या कर्मचा-याची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | १९ | ९ | १० | ३ | १ | २ |
| २ | ब | २० | १२ | ८ | ४ | ३ | १ |
| ३ | क | ३५६ | ३०० | ५६ | ३७ | ३२ | ५ |
| ४ | ड | १५८ | १४६ | १२ | १२ | १२ | ० |
| | **एकुण अबकड** | **५५३** | **४६७** | **८६** | **५६** | **४८** | **८** |

**एकूण मंजुर पदे (तांत्रिक + अतांत्रिक) = १७७४**

**एकूण भरलेली पदे (तांत्रिक + अतांत्रिक) = १५२६**

नवी मुंबई महानगरपालिकेतील संवर्गनिहाय स्थितीत कार्यरत इतर मागस वर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्याची माहिती दि.३१/१२/२०१४ अखर

तांत्रिक (सरळसेवा)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचीत जाती साठी टकेवारी नुसार आरक्षित पदे | प्रत्यक्ष सेवेत असलेल्या अनुसुचीत जातीच्या कर्मचाऱ्याची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | १०४ | ८८ | १६ | १४ | ११ | ३ |
| २ | ब | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | क | ७३६ | ६३६ | १०० | ६० | ५५ | ५ |
| ४ | ड | २७३ | २५४ | १९ | १६ | १६ | ० |
| | एकुण अबकड | १११३ | ९७८ | १३५ | ९० | ८२ | ८ |

सफाई कामगार संवर्गासाठी बिदु नामावली नाही. (मंजुर पदे ८६ व भरलेली पदे ८३)

अतांत्रिक (सरळसेवा)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचीत जाती साठी टकेवारी नुसार आरक्षित पदे | प्रत्यक्ष सेवेत असलेल्या अनुसुचीत जातीच्या कर्मचाऱ्याची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | ८ | २ | ६ | १ | ० | १ |
| २ | ब | ९ | १ | ८ | २ | १ | १ |
| ३ | क | १९५ | १७३ | २२ | १५ | १४ | १ |
| ४ | ड | १५८ | १४६ | १२ | १२ | १२ | ० |
| | एकुण अबकड | ३७० | ३२२ | ४८ | ३० | २७ | ३ |

नवी मुंबई महानगरपालिकेतील संवर्गनिहाय सद्यस्थितीत कार्यरत इतर मागास [illegible] अधिकारी कर्मचाऱ्यांची माहिती दि.३१/१२/२०१८ अखेर

तांत्रिक (पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचीत जाती साठी टकेवारी नुसार आरक्षित पदे | प्रत्यक्ष सेवेत असलेल्या अनुसुचीत जातीच्या कर्मचा-याची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | २९ | २६ | ३ | ६ | ४ | २ |
| २ | ब | १ | १ | ० | ० | ० | ० |
| ३ | क | ७४ | ५१ | २३ | १२ | ९ | ३ |
| ४ | ड | ४ | ३ | १ | १ | ० | १ |
| **एकुण अबकड** | | **१०८** | **८१** | **२७** | **१९** | **१३** | **६** |

अतांत्रिक (पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचीत जाती साठी टकेवारी नुसार आरक्षित पदे | प्रत्यक्ष सेवेत असलेल्या अनुसुचीत जातीच्या कर्मचा-याची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | ११ | ७ | ४ | २ | १ | १ |
| २ | ब | ११ | ११ | ० | २ | २ | ० |
| ३ | क | १६१ | १२७ | ३४ | २२ | १८ | ४ |
| ४ | ड | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **एकुण अबकड** | | **१८३** | **१४५** | **३८** | **२६** | **२१** | **५** |

नवी मुंबई महानगरपालिकेतील संवर्गनिहाय सद्यस्थितात कायरत इतर मागस वर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्यांची माहिती दि.३१/१०/२०१५ अखेर

तांत्रिक (सरळसेवा व पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचीत जाती साठी टकेवारी नुसार आरक्षित पदे | प्रत्यक्ष सेवेत असलेल्या अनुसुचीत जातीच्या कर्मचा-याची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | १३३ | ११४ | १९ | २० | १५ | ५ |
| २ | ब | १ | १ | ० | ० | ० | ० |
| ३ | क | ८१० | ६८७ | १२३ | ७२ | ६७ | ५ |
| ४ | ड | २७७ | २५७ | २० | १७ | १६ | १ |
| | **एकुण अबकड** | **१२२१** | **१०५९** | **१६२** | **१०९** | **९८** | **११** |

अतांत्रिक (सरळसेवा व पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचीत जाती साठी टकेवारी नुसार आरक्षित पदे | प्रत्यक्ष सेवेत असलेल्या अनुसुचीत जातीच्या कर्मचा-याची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | १९ | ९ | १० | ३ | १ | २ |
| २ | ब | २० | १२ | ८ | ४ | ३ | १ |
| ३ | क | ३५६ | ३०० | ५६ | ३७ | ३२ | ५ |
| ४ | ड | १५८ | १४६ | १२ | १२ | १२ | ० |
| | **एकुण अबकड** | **५५३** | **४६७** | **८६** | **५६** | **४८** | **८** |

**एकूण मंजुर पदे (तांत्रिक + अतांत्रिक) = १७७४**

**एकूण भरलेली पदे (तांत्रिक + अतांत्रिक) = १५२६**

नवी मुंबई महानगरपालिकेतील संवर्गनिहाय सद्यस्थितीत कार्यरत इतर मागस वर्गातील अधिकारी/ कर्मचाऱ्याची माहिती दि.३१/१०/२०१५ अखेर



तांत्रिक (सरळसेवा)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचीत जाती साठी टकेवारी नुसार आरक्षित पदे | प्रत्यक्ष सेवेत असलेल्या अनुसुचीत जातीच्या कर्मचाऱ्याची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | १०४ | ८८ | १६ | १४ | ११ | ३ |
| २ | ब | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | क | ७३६ | ६३६ | १०० | ६० | ५५ | ५ |
| ४ | ड | २७३ | २५४ | १९ | १६ | १६ | ० |
| | एकुण अबकड | १११३ | ९७८ | १३५ | ९० | ८२ | ८ |

सफाई कामगार संवर्गासाठी बिंदु नामावली नाही. (मंजुर पदे ८६ व भरलेली पदे ८३)

अतांत्रिक (सरळसेवा)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचीत जाती साठी टकेवारी नुसार आरक्षित पदे | प्रत्यक्ष सेवेत असलेल्या अनुसुचीत जातीच्या कर्मचाऱ्याची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | ८ | २ | ६ | १ | ० | १ |
| २ | ब | ९ | १ | ८ | २ | १ | १ |
| ३ | क | १९५ | १७३ | २२ | १५ | १४ | १ |
| ४ | ड | १५८ | १४६ | १२ | १२ | १२ | ० |
| | एकुण अबकड | ३७० | ३२२ | ४८ | ३० | २७ | ३ |

नवी मुंबई महानगरपालिकेतील संवर्गनिहाय सद्यस्थितीत कार्यरत इतर मागास वर्गातील अधिकारी/ क[illegible]चायाची माहिती दि.३१/१०/२०१५ अखेर

तांत्रिक (पदोन्नती)

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचीत जाती साठी टकेवारी नुसार आरक्षित पदे | प्रत्यक्ष सेवेत असलेल्या अनुसुचीत जातीच्या कर्मचा-याची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | २९ | २६ | ३ | ६ | ४ | २ |
| २ | ब | १ | १ | ० | ० | ० | ० |
| ३ | क | ७४ | ५१ | २३ | १२ | ९ | ३ |
| ४ | ड | ४ | ३ | १ | १ | ० | १ |
| एकुण अबकड | | १०८ | ८१ | २७ | १९ | १३ | ६ |

अतांत्रिक (पदोन्नती )

| अ.क्र. | वर्ग | निर्माण पदे | भरलेली पदे | रिक्त पदे | अनुसुचीत जाती साठी टकेवारी नुसार आरक्षित पदे | प्रत्यक्ष सेवेत असलेल्या अनुसुचीत जातीच्या कर्मचा-याची संख्या | अनुशेष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अ | ११ | ७ | ४ | २ | १ | १ |
| २ | ब | ११ | ११ | ० | २ | २ | ० |
| ३ | क | १६१ | १२७ | ३४ | २२ | १८ | ४ |
| ४ | ड | ० | ० | ० | ० | ० | ० |
| एकुण अबकड | | १८३ | १४५ | ३८ | २६ | २१ | ५ |

## नवी मुंबई महानगरपालिका
### प्रशासन विभाग
### दिनांक-३१/०६/२०१२ पर्यंत अनुशेषाची पदे भरल्याबाबतच्या माहितीचे विवरण
### प्रपत्र-१ (सरळसेवा) गट-अ

| | | एकूण | SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | SBC | OBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | दि.३१.३.२०११ रोजी मजुर पदे | ११३ | १६ | ६ | ३ | २ | ३ | २ | २ | १७ | ६२ |
| (ब) | दि.३१.३.२०११ रोजी भरलेली पदे | ९१ | ११ | ६ | २ | २ | ३ | २ | १ | १५ | ४९ |
| (क) | दि.३१.३.२०११ रोजी रिक्त पदे | २२ | ५ | ० | १ | ० | ० | ० | १ | २ | १३ |
| (ड) | भरलेल्या पदांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार किती पदे भरणे आवश्यक (एकुण भरलेली पदे x आरक्षणाची टक्केवारी)/ १०० | ९१ | ११ | ६ | २ | २ | ३ | २ | १ | १५ | ४९ |
| (ई) | अनुशेष (ड) - (ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (फ) | दिनांक १.४.२०११ ते दिनांक ३०.०६.२०१२ या कालावधीत अनुशेषाची भरलेली पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (ग) | शिल्लक अनुशेष (ई) - (फ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (ह) | अनुशेष शिल्लक राहण्याची कारणे | निरंक | | | | | | | | | |

### (सरळसेवा) गट-ब

| | | एकूण | SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | SBC | OBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | दि.३१.३.२०११ रोजी मजुर पदे | ९ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७ |
| (ब) | दि.३१.३.२०११ रोजी भरलेली पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (क) | दि.३१.३.२०११ रोजी रिक्त पदे | ९ | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ७ |
| (ड) | भरलेल्या पदांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार किती पदे भरणे आवश्यक (एकुण भरलेली पदे x आरक्षणाची टक्केवारी)/ १०० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (ई) | अनुशेष (ड) - (ब) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (फ) | दिनांक १.४.२०११ ते दिनांक ३०.०६.२०१२ या कालावधीत अनुशेषाची भरलेली पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (ग) | शिल्लक अनुशेष (ई) - (फ) | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (ह) | अनुशेष शिल्लक राहण्याची कारणे | निरंक | | | | | | | | | |

## (सरळसेवा) गट-क

| | | एकुण | SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | SBC | OBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | दि.३१.३.२०११ रोजी मजुर पदे | ९४८ | ७६ | २०५ | ३५ | २२ | २८ | १३ | १४ | ८० | ४७५ |
| (ब) | दि.३१.३.२०११ रोजी भरलेली पदे | ८०६ | ७६ | १२४ | २९ | १८ | २६ | १२ | १४ | ७२ | ४३५ |
| (क) | दि.३१.३.२०११ रोजी रिक्त पदे | १४२ | ० | ८१ | ६ | ०४ | २ | १ | ० | ८ | ४० |
| (ड) | भरलेल्या पदांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार किती पदे भरणे आवश्यक (एकुण भरलेली पदे x आरक्षणाची टक्केवारी) /१०० | ८०६ | ६५ | १७४ | २८ | १५ | २७ | ११ | १२ | ६२ | ४१२ |
| (ई) | अनुशेष (ड) - (ब) | ० | -११ | ५० | -१ | -३ | १ | -१ | -२ | -१० | -२३ |
| (फ) | दिनांक १.४.२०११ ते दिनांक ३०.०६.२०१२ या कालावधीत अनुशेषाची भरलेली पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (ग) | शिल्लक अनुशेष (ई) - (फ) | ० | -११ | ५० | -१ | -३ | १ | -१ | -२ | -१० | -२३ |
| (ह) | अनुशेष शिल्लक राहण्याची कारणे | नमुमपाच्या आस्थापनेवर अ जमाती-५० व भज (क)-१, या प्रवर्गातील **एकुण-५१** पदाचा अनुशेष शिल्लक असुन, अनुशेषाची पदे भरण्यासाठी दि.१४/०१/२०१२ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे व परिक्षा घेण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. | | | | | | | | | |

## * (सरळसेवा) गट-ड

| | | एकूण | SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | SBC | OBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | दि.३१.३.२०११ रोजी मजुर पदे | ४३१ | २८ | ७६ | ११ | ८ | ११ | ६ | ६ | २९ | २५६ |
| (ब) | दि.३१.३.२०११ रोजी भरलेली पदे | ३७४ | २७ | ४९ | ९ | ९ | ९ | ५ | ४ | २७ | २३५ |
| (क) | दि.३१.३.२०११ रोजी रिक्त पदे | ५७ | १ | २७ | २ | -१ | २ | १ | २ | २ | २१ |
| (ड) | भरलेल्या पदांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार किती पदे भरणे आवश्यक (एकुण भरलेली पदे x आरक्षणाची टक्केवारी) १००% | ३७४ | २२ | ६४ | १० | ६ | १० | ५ | ५ | २५ | २२७ |
| (ई) | अनुशेष (ड) - (ब) | ० | -५ | १५ | १ | -३ | १ | - | १ | -२ | -८ |
| (फ) | दिनांक १.४.२०११ ते दिनांक ३०.०६.२०१२ या कालावधीत अनुशेषाची भरलेली पदे | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| (ग) | शिल्लक अनुशेष (ई) - (फ) | ० | -५ | १५ | १ | -३ | १ | - | १ | -२ | -८ |
| (ह) | अनुशेष शिल्लक राहण्याची कारणे | नमुमपाच्या आस्थापनेवरील अनूसूचित जमाती-१५, विमुक्त जाती (अ)-१, भटक्या जमाती (क)-१, विशेष मागास प्रवर्ग-१ या प्रवर्गातील एकुण १८ पदाचा अनुशेष शिल्लक असुन, अनुशेषाची पदे भरण्यासाठी दि.१४/०१/२०१२ रोजी जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे व परिक्षा घेण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. | | | | | | | | | |

* **टिप :-** नमुंमपाच्या आस्थापनेवर सफाई कामगार संवर्गाची एकुण ८६ पदे मंजुर असुन त्यापैकी ८३ पदे भरण्यात आलेली आहेत. सफाई कामगार या संवर्गासाठी बिंदूनामावली नसल्याने सर्व पदे खुल्या प्रवर्गामध्ये दर्शविण्यात आलेली आहेत.

## (सरळसेवा) गट-अ, ब, क व ड

| | | एकुण | SC | ST | VJ (A) | NT (B) | NT (C) | NT (D) | SBC | OBC | OPEN |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (अ) | दि.३१.३.२०११ रोजी मजुर पदे | १५०१ | १२२ | २८७ | ४९ | ३२ | ४२ | २१ | २२ | १२६ | ८०० |
| (ब) | दि.३१.३.२०११ रोजी भरलेली पदे | १२७१ | ११४ | १७९ | ४० | २९ | ३८ | १९ | १९ | ११४ | ७१९ |
| (क) | दि.३१.३.२०११ रोजी रिक्त पदे | २३० | ८ | १०८ | ९ | ३ | ४ | २ | ३ | १२ | ८१ |
| (ड) | भरलेल्या पदांमध्ये आरक्षणाच्या टक्केवारीनुसार किती पदे भरणे आवश्यक (एकुण भरलेली पदे x आरक्षणाची टक्केवारी) १००% | १२७१ | ९८ | २४४ | ४० | २३ | ४० | १८ | १८ | १०२ | ६८८ |
| (ई) | अनुशेष (ब) - (ड) | ० | -१६ | ६५ | ० | -६ | २ | -१ | -१ | -१२ | -३१ |
